
रायगड, नवी मुंबई

◆ वर्ष १९ ◆ अंक ८

www.ramprahar.com

# राम प्रहर

◆ शनिवार, २५ जुलै २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २



पंढरपूर : आषाढी एकादशी सोहळ्यासाठी हजारो वारकरी आणि भाविक पंढरी नगरीत दाखल झाले आहेत. या मांदियाळीचे चंद्रभागा तीरावरून आदित्य झिंगाडे यांनी टिपलेले ड्रोन छायाचित्र.

### रायगड जिल्हा किसान मोर्चातर्फे पनवेलमध्ये कृतज्ञता मेळावा

# शेतकऱ्यांच्या सक्षमीकरणासाठी सरकार कटिबद्ध -मंत्री आशिष शेलार

### कर्जमाफीबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आभार




**पनवेल : रामप्रहर वृत्त**

मातीची सेवा करणारा, निसर्गाचे रक्षण करणारा आणि देशाला अन्नधान्य पुरवणारा बळीराजा हा देशाच्या अर्थव्यवस्थेचा कणा असून शेतकऱ्यांच्या सक्षमीकरणासाठी केंद्र व राज्य सरकार कटिबद्ध आहे, अशी ग्वाही राज्याचे माहिती व तंत्रज्ञान, सांस्कृतिक कार्यमंत्री तथा रायगड जिल्ह्याचे संपर्कमंत्री ॲड.आशिष शेलार यांनी येथे दिली.

राज्यातील शेतकऱ्यांना कर्जमाफी दिल्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व महायुती सरकारचे अभिनंदन तसेच आभार मानण्यासाठी भाजप उत्तर रायगड जिल्हा किसान मोर्चाच्या वतीने पनवेल मार्केट यार्ड येथे गुरुवारी (दि.२३) कृतज्ञता मेळावा आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी मंत्री ॲड. शेलार प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. राज्यातील शेतकऱ्यांना सरसकट दोन लाख रुपयांपर्यंतची कर्जमाफी, वीजबिल माफी तसेच विविध कृषी कल्याणकारी योजनांच्या माध्यमातून मोठा दिलासा देण्यात आला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील सरकारने शेतकऱ्यांच्या हिताचे ऐतिहासिक निर्णय घेतले असून त्याबद्दल संपूर्ण शेतकरी समाज सरकारप्रती कृतज्ञ आहे, असे त्यांनी सांगितले.

या मेळाव्याला भाजपचे महाराष्ट्र प्रदेश चिटणीस आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, आमदार विक्रांत पाटील, भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, महापौर नितीन पाटील, रायगड जिल्हा परिषदेचे अध्यक्ष मंगेश वाकडीकर, पनवेल महापालिकेचे माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे, जिल्हा सरचिटणीस व पनवेल महापालिकेचे सभागृहनेते ॲड. प्रकाश बिनेदार, दीपक बेहेरे, पनवेल पंचायत समितीच्या रंजना वास्कर, उपसभापती भूपेंद्र पाटील, खालापूर पंचायत समिती सभापती कृष्णा पारंगे, भाजप जिल्हा उपाध्यक्ष मयुरेश नेतकर, युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष आनंद ढवळे, किसान मोर्चाचे जिल्हाध्यक्ष सागर सांगडे यांच्यासह स्थानिक स्वराज्य संस्थांचे लोकप्रतिनिधी, पदाधिकारी आणि शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आपल्या भाषणात मंत्री आशिष शेलार पुढे म्हणाले की, शेतकरी हा माती आईची सेवा करणारा खरा कर्मयोगी आहे. त्याच्या कष्टातून शेतात सोने पिकते आणि त्याच उत्पादनाच्या विक्रीतून तो आपल्या कुटुंबाचा वर्षभराचा उदरनिर्वाह करतो, मात्र दुष्काळ, अतिवृष्टी, अवकाळी पाऊस, गारपीट आणि इतर नैसर्गिक संकटांमुळे शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होते. **(पान २ वर..)**

### शेतकरी देशाच्या अर्थव्यवस्थेचा मजबूत पाया -आमदार प्रशांत ठाकूर

यावेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी भाषणात म्हटले की, शेतकरी हा केवळ अन्नदाता नाही, तर देशाच्या अर्थव्यवस्थेचा मजबूत पाया आहे. शेतकऱ्यांच्या कष्टामुळे आपल्या प्रत्येकाच्या घरात अन्न पोहचते, मात्र अनेक वर्षे नैसर्गिक आपत्ती, उत्पादन खर्चातील वाढ, बाजारभावातील चढ-उतार आणि कर्जाच्या ओझ्यामुळे शेतकरी अडचणीत सापडला होता. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील महायुती सरकारने या परिस्थितीची जाणीव ठेवून शेतकऱ्यांसाठी सरसकट दोन लाख रुपयांपर्यंतची कर्जमाफी जाहीर केली. हा निर्णय लाखो शेतकरी कुटुंबांना नवसंजीवनी देणारा आहे. त्याचबरोबर वीजबिल माफी, पीक विमा, सिंचन सुविधा, कृषी यांत्रिकीकरण, बाजारपेठेचा विस्तार, आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून शेती अधिक सक्षम करण्याचे कामही शासनाने सातत्याने केले आहे.

## पेपरफुटी रोखण्यासाठी कठोर शिक्षा देणारे नवे विधेयक येणार

### मोदी सरकारचा महत्त्वपूर्ण निर्णय; मसुद्याला मंजुरी



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

नीट पेपरफुटी प्रकरणाची केंद्र सरकारने गंभीर दखल घेतली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली शुक्रवारी (दि. २४) झालेल्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत पेपरफुटीविरोधातील विद्यमान कायद्यांपेक्षा अधिक कठोर शिक्षा देणाऱ्या नव्या विधेयकाच्या मसुद्याला मंजुरी देण्यात आली.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नीट पेपरफुटी प्रकरणात जे जे दोषी आहेत, त्यांना शिक्षा देण्यासाठी फास्ट ट्रॅक कोर्टाची स्थापना करणार असल्याची घोषणा केली होती तसेच पेपरफुटी थांबविण्यासाठी नवीन कायदा करणार असल्याचेही म्हटले होते. त्यानुसार शुक्रवारी संसद भवनातील संकुलात झालेल्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत पेपरफुटीविरोधी विधेयकाचा मसुदा मांडण्यात आला. या मसुद्याला मंत्रिमंडळाने पाठिंबा दिला असून लवकरच हे विधेयक संसदेत मंजुरीसाठी मांडले जाणार आहे. वृत्तानुसार पेपरफुटी प्रकरणांच्या सुनावणीसाठी जलदगती न्यायालये स्थापन करण्याची तरतूद कायद्यात समाविष्ट करण्यात आली आहे.

सध्याच्या कायद्यानुसार पेपरफुटी प्रकरणात दोषी आढळल्यास तीन ते पाच वर्षांचा कारावास आणि १० लाख रुपयांपर्यंतच्या दंडाची तरतूद आहे. नव्या कायद्यानुसार पेपरफुटीच्या गुन्ह्यात सहभागी असलेल्यांना १० वर्षांपर्यंतच्या कारावासाची आणि १० कोटी रुपयांपर्यंतच्या दंडाची शिक्षा होऊ शकते. हे सुधारित विधेयक येत्या सोमवारी (दि. २७) लोकसभेत मांडले जाण्याची शक्यता आहे.

### पंतप्रधान मोदींचा तरुणाईला संदेश



**नवी दिल्ली :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गुरुवारी रात्री एक अनौपचारिक व्हिडीओ सोशल मीडियावर शेअर केला. याद्वारे त्यांनी नीट पेपरफुटी आणि परीक्षांमधील गैरप्रकारांचा मुद्दा अत्यंत वेदनादायी असल्याचे सांगत तरुणांना महत्त्वाचा संदेश दिला.

या व्हिडीओमध्ये पंतप्रधान मोदी यांनी पेपरफुटीविरोधात कठोर कायदा आणण्याची घोषणा करत फास्ट-ट्रॅक न्यायालयांमध्ये सुनावणी होईल तसेच पावसाळी अधिवेशनाच्या दुसऱ्या आठवड्यात संबंधित विधेयक संसदेत सादर करण्यात येणार असल्याचे सांगितले.

### ...अन् वांगचुक यांचे उपोषण सुटले



**नवी दिल्ली :** प्रसिद्ध शिक्षणतज्ज्ञ आणि सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक यांनी अखेर गुरुवारी मध्यरात्री आपले आमरण उपोषण मागे घेतले आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीनंतर सरकार आणि वांगचुक यांच्यात सहमती झाली. मग केंद्रीय मंत्र्यांनी गुरुग्राम येथील मेदांता रुग्णालयात जाऊन वांगचुक यांना आश्वासनाचे पत्र सोपवले. त्यानंतर त्यांनी आपले उपोषण मागे घेतले.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, केंद्रीय आरोग्यमंत्री जे. पी. नड्डा आणि पंतप्रधान कार्यालयातील राज्यमंत्री डॉ. जितेंद्र सिंह यांच्यात सुमारे चार तास उच्चस्तरीय बैठक झाली. या बैठकीत सोनम वांगचुक यांच्या मागण्या आणि त्यांच्या खालावत चाललेल्या आरोग्यावर चर्चा करण्यात आली. सरकारने वांगचुक यांच्या मागण्यांवर सकारात्मक भूमिका घेण्याचा निर्णय घेतला तसेच त्यांचे आरोग्य आणि सुरक्षा याला सर्वोच्च प्राधान्य दिले जाईल, असेही ठरवण्यात आले. गृहमंत्री शाह यांच्या सूचनेनुसार डॉ. सिंह यांनी वांगचुक यांच्या पत्नीशी फोनवर चर्चा केली. त्यानंतर जे.पी. नड्डा आणि डॉ. सिंह हे गुरुग्राम येथील मेदांता रुग्णालयात पोहोचले, जिथे त्यांनी वांगचुक यांना सरकारतर्फे आश्वासनाचे अधिकृत पत्र सुपूर्द केले.

## निवडक

### हिमाचल प्रदेशात वाहनावर दरड कोसळून १३ जण ठार

**शिमला :** हिमाचल प्रदेशातील लाहौल-स्पिती आणि चंबा जिल्ह्याच्या सीमेवर एक अतिशय दुर्दैवी घटना घडली आहे. उदयपूर-किलाड मार्गावरील कडू नाला येथे चालत्या टाटा सुमो टॅक्सीवर अचानक डोंगराचा मोठा भाग कोसळला. या भीषण दुर्घटनेत वाहन मलब्याखाली दबून सहा महिन्यांच्या लहान बाळासह १३ प्रवाशांचा जागीच मृत्यू झाला, तर दोन जण सुदैवाने बचावले आहेत.

### आयएसएसएफ विश्वचषकात भारताच्या सैन्यमचा 'रौप्य'वेध

**नवी दिल्ली :** भारताची नेमबाज सैन्यम हिने चीनमधील हांगझोउ येथे सुरू असलेल्या आयएसएसएफ विश्वचषक स्पर्धेत शानदार कामगिरी करत महिला १० मीटर एअर पिस्तूल प्रकारात रौप्यपदक आपल्या नावावर केले. यासह तिने स्पर्धेत भारताचे पदक खातेही उघडले. तिचे सुवर्णपदक अवघ्या पॉईंट ०.२च्या फरकाने हुकले, पण पण तिने चीनच्या जगातील नंबर १ खेळाडूला कडवी झुंज दिली. **(सविस्तर पान ८ वर..)**



### पेण वरवणे येथे पुन्हा भूस्खलन

#### ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण; उपाययोजनेची मागणी

**पेण : प्रतिनिधी**

पेण तालुक्यातील वरवणे गावात मुसळधार पावसामुळे डोंगर खचून पुन्हा भूस्खलन झाले. या घटनेमुळे ग्रामस्थांमध्ये भीतीचे आणि चिंतेचे वातावरण पसरले आहे.

मुसळधार पावसामुळे पेणच्या वरवणे गावालवळील साईचा डोंगर खचला व त्याचा काही भाग वाहून गेला. सततच्या उत्खननामुळे आणि पावसामुळे डोंगराला मोठा धोका निर्माण झाला आहे. गावालगतच डोंगर असल्याने येथे 'माळीण'सारखी दुर्घटना घडण्याची भीती स्थानिकांनी व्यक्त केली आहे.

ग्रामस्थांनी येथील परिस्थिती अतिशय धोकादायक असल्याचे सांगून प्रशासनाला तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली आहे. प्रशासनाकडून दरडप्रवण क्षेत्रातील नागरिकांना सतर्क राहण्याचे आणि सुरक्षित ठिकाणी जाण्याचे आवाहन करण्यात आले आहे

## टेबल टेनिसपटू स्वस्तिका घोषची कॉमनवेल्थ चॅम्पियनशिपसाठी भारतीय संघात निवड

### लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याकडून अभिनंदन अन् शुभेच्छा



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खांदा कॉलनीतील चांगू काना ठाकूर (सीकेटी) महाविद्यालयाची विद्यार्थिनी आणि जागतिक ख्यातीची आंतरराष्ट्रीय टेबल टेनिसपटू स्वस्तिका संदीप घोष हिची आगामी कॉमनवेल्थ चॅम्पियनशिप स्पर्धेसाठी भारतीय संघात निवड झाली आहे. या मानाच्या स्पर्धेत ती आता भारताचे प्रतिनिधित्व करणार असून याबद्दल संस्थेचे चेअरमन, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी स्वस्तिकाचे अभिनंदन करून स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

स्वस्तिका घोष ही सध्या सीकेटी महाविद्यालयाच्या इंग्रजी विभागात पदव्युत्तर शिक्षण घेत आहे. उच्च शिक्षणासोबतच तिने खेळातील सातत्य आणि आपला जागतिक दर्जाचा फॉर्म कायम राखला आहे. टेबल टेनिसच्या पटलावर आपल्या वेगवान आणि आक्रमक खेळासाठी ओळखल्या जाणाऱ्या स्वस्तिकाने यापूर्वीही अनेक राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये घवघवीत यश संपादन करून पनवेलसह महाराष्ट्राचे आणि देशाचे नाव उंचावले आहे. आता कॉमनवेल्थ चॅम्पियनशिपमध्ये भारतीय संघाकडून खेळताना सुवर्णपदक जिंकण्याचे तिचे लक्ष्य असणार आहे.

स्वस्तिकाच्या या निवडीबद्दल संस्थेचे चेअरमन लोकनेते रामशेठ ठाकूर साहेब, अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय.टी. देशमुख, संस्थेच्या कार्यकारी मंडळाचे सदस्य तथा पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर, नगरसेवक परेश ठाकूर, सचिव डॉ. एस.टी. गडदे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस.के.पाटील, क्रीडा संचालक डॉ. विनोद नाईक, इंग्रजी विभागाचे प्रमुख डॉ. आर.व्ही. येवले यांच्यासह प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी तिचे भरभरून कौतुक केले आहे.

### कर्जमुक्ती योजनेतील १६.९६ लाख पात्र शेतकऱ्यांची यादी जाहीर

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्य शासनाच्या महत्त्वाकांक्षी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६ अंतर्गत १६ लाख ९६ हजार पात्र शेतकऱ्यांची यादी जाहीर करण्यात आली असून उर्वरित पात्र शेतकऱ्यांच्या याद्याही लवकरच प्रसिद्ध करण्यात येणार असल्याची माहिती सहकारमंत्री बाबासाहेब पाटील यांनी दिली आहे.

योजनेतील पात्र लाभार्थ्यांची यादी संबंधित बँकांनी महाआयटीने विकसित केलेल्या पोर्टलवर अपलोड केली असून त्याची पडताळणी पूर्ण झाली आहे. या योजनेंतर्गत राज्यातील सुमारे ५६ लाख पात्र शेतकऱ्यांना कर्जमुक्तीचा लाभ मिळणार आहे. पात्र शेतकऱ्यांनी लाभ मिळविण्यासाठी ॲग्रीस्टॅकवर नोंदणी करून आधार प्रमाणीकरण प्रक्रिया तातडीने पूर्ण करावी, असे आवाहन सहकारमंत्री पाटील यांनी केले आहे.

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे

**रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल, उलवे**

प्लॉट न. 01 व 02, सेक्टर-12, उलवे, ता. पनवेल, जि. रायगड-410206

U-Dise No.-27244100042 CBSE Affiliation No. 1131483 School No.31472

शाळेसाठी खालील पदे भरावयाची आहेत.

| पदनाम | शैक्षणिक पात्रता | पदांची संख्या |
|---|---|---|
| शिपाई | 10 वी पास | 03 |

- वरील पदासाठी जागा भरावयाच्या आहेत, तरी इच्छुक उमेदवारांनी आपला अर्ज व त्यासोबत आधार कार्ड, पॅनकार्ड झेरॉक्स प्रत व एक फोटो प्राचार्य, रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल, उलवे, प्लॉट नं. 1 आणि 2, सेक्टर-12, उलवे, ता.-पनवेल, जि.- रायगड - 410206 येथे जमा करणे.
- उमेदवार सोमवार, 10 ऑगस्ट 2026 रोजी किंवा त्यापूर्वी rtpsulwe@gmail.com या ईमेलवर किंवा टपालाने अर्ज सादर करू शकतात.
- आवश्यक असल्यास संपर्क - सौ. दीप्ती ठाकूर - (शाळा कार्यालय) 8689998947

मा. श्री. रामशेठ ठाकूर (माजी खासदार )
चेअरमन,
जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्था, पनवेल.



### 'भगव्या दहशतवादा'च्या फेक नॅरेटिव्हचा पर्दाफाश

ज्यांचा हा देश आहे त्या हिंदूंनाच देशात दहशतवादी ठरवण्याचे षड्यंत्र कसे रचले गेले, याची कहाणी वाचा केंद्रीय गृहमंत्रालयाच्या सुरक्षा विभागाचे माजी अवर सचिव आर.व्ही.एस. मणी यांच्या मुलाखतीतून... सरकारी यंत्रणांचा गैरवापर करून राष्ट्रीय सुरक्षेला धाब्यावर बसवणाऱ्या काँग्रेस राजवटीचे हे कारस्थान या मुलाखतीतून उघड झाले आहे. 'एएनआय'च्या स्मिता प्रकाश यांनी घेतलेली ही मुलाखत संपादित स्वरूपात 'मुंबई तरुण भारत'ने प्रकाशित केली आहे. ती आम्ही 'रामप्रहर'च्या वाचकांसाठी येत्या रविवार, २६ जुलैपासून पाच भागांमध्ये रोज सलग प्रसिद्ध करणार आहोत.



# नागरिकांच्या आरोग्यास घातक ठरणारे प्रकल्प होऊ देणार नाही -मंत्री गोगावले

**माणगाव : बातमीदार**

बल्क ड्रग पार्क विरोधात एकवटलेल्या संघर्ष समितीने शुक्रवार दि. २४ जुलै रोजी राज्याचे कॅबिनेट मंत्री भरतशेठ गोगावले यांची भेट घेऊन माणगाव व रोहा तालुक्यातील बाधीत सर्व ग्रामपंचायतीच्या संघर्ष समितीसह नागरिकांनी बल्क ड्रग पार्क रद्द होण्याबाबत निवेदन दिले. नागरिकांच्या आरोग्यास घातक ठरणारे प्रकल्प होऊ देणार नाही. मंत्री असलो तरी आपल्यासोबत राहीन असे अश्वासन कॅबिनेट मंत्री भरतशेठ गोगावले यांनी उपस्थितांना दिले. यावेळी २१ गाव वाड्यातील सुमारे २५० /३०० नागरिक उपस्थितीत होते.



माणगाव रोहा तालुक्यातील बल्क ड्रग पार्क विरोधात स्थापन करण्यात आलेल्या संघर्ष समितीच्या सभेत स्थानिक लोकप्रतिनिधी, आमदार, खासदार, मतदार संघातील मंत्री महोदय यांना निवेदन देऊन बल्क ड्रग पार्क रद्द करण्याकामी सहकार्य करण्याची विनंती करावी असे ठरविण्यात आले होते. त्यानुसार महाड माणगाव पोलादपूर मतदार संघाचे आमदार तथा नामदार भरतशेठ गोगावले यांनी तत्काळ वेळ देऊन ढालकाठी येथील आपल्या शिवनेरी निवासस्थानी आयोजित केलेल्या चर्चासत्रा समितीसह नागरिकांचे निवेदनासोबत म्हणणे ऐकून घेतले.

त्यावेळी संघर्ष समितीचे अध्यक्ष बाबुशेठ खानविलकर, उपाध्यक्ष संदीपशेठ जाधव, माणगाव पंचायत समितीचे सभापती विलास शिंदे, निजामपूर जिल्हा परिषद सदस्य अविनाश नलावडे, भुवन ग्राम पंचायत सरपंच दीपकशेठ जाधव , भाले सरपंच दत्ताशेठ खांबे, माजी सरपंच राजाभाऊ रणपिसे, विपुल उभारे, परेश सांगळे सुधीर पवार, प्रसाद गुरव, बाळाराम दबडे, भागाराम मंचेकर, , संतोष जागडे, मिलिंद खानविलकर, प्रदिप चव्हाण,संजय खानविलकर, जगदीश खानविलकर, संभाजी जाधव, एकनाथ मानकर, मंगेश पवार, नरेश कदम, पंढरीनाथ उतेकर, गणेश सुकुम, रमेश लाडघरे, शंकर पवार, सयाजी मोरे, जनार्दन सिलीमकर, प्रतीक रहाटे, दिलीप सांगळे, तुकाराम साळवी, इत्यादी मान्यवरसंह केमिकल झोन बाधीत सर्व गाव वाड्यातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मानसरोवर रेल्वेस्थानक लिंक रोडच्या विकासासाठी नगरसेविका बायजा बारगजे यांचे महापौरांना निवेदन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कळंबोलीरोडपालीकामोठे (मानसरोवर रेल्वे स्थानक) प्रस्तावित लिंक रोड तातडीने विकसित करण्यात यावा, अशी मागणी नगरसेविका बायजा बबन बारगजे यांनी पनवेल महानगरपालिकेच्या महापौरांकडे निवेदनाद्वारे केली.

निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, सदर लिंक रोड विकसित झाल्यास कळंबोली, रोडपाली आणि कामोठे परिसरातील वाहतूक कोंडी मोठ्या प्रमाणात कमी होऊन नागरिकांना सुरक्षित, जलद आणि सुलभ प्रवासाची सुविधा मिळेल. भविष्यातील वाढती लोकसंख्या आणि वाहतूक लक्षात घेता या रस्त्याचे काम प्राधान्याने हाती घेणे आवश्यक असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.




यावेळी नगरसेविका सौ बायजा बबन बारगजे भाजपा भटके विमुक्त मोर्चाचे जिल्हाध्यक्ष बबनराव बारगजे, कळंबोली / रोडपाली कामोठे लिंक रोड कृती समितीचे प्रमुख महेंद्र खबाले, राजेंद्र सूर्यवंशी तसेच भाजपा पदाधिकारी सौ कमल सरगर उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनीही नागरिकांच्या हितासाठी हा महत्त्वाचा लिंक रोड लवकरात लवकर विकसित करण्याची मागणी प्रशासनाकडे केली.

या मागणीच्या निवेदनाच्या प्रती पनवेल महानगरपालिकेचे माननीय आयुक्त मंगेश चितळे, पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर, शहर अभियंता राजेश कर्डिले तसेच सभागृह नेते प्रकाश बिनेदार यांनाही देण्यात आल्या असून, या महत्त्वाच्या प्रश्नावर तातडीने सकारात्मक कार्यवाही करण्याची मागणी करण्यात आली आहे. नागरिकांच्या दैनंदिन प्रवासाला दिलासा मिळावा आणि परिसराच्या सर्वांगीण विकासाला गती मिळावी यासाठी महानगरपालिकेने आवश्यक प्रक्रिया पूर्ण करून लिंक रोडचे काम तातडीने करावे.

## घरफोडी प्रकरणात दोघांना शिक्षा

### मुख्य आरोपीला पाच वर्षांची सक्तमजुरी

**अलिबाग : प्रतिनिधी**

घरफोडीच्या प्रकरणा दोन आरोपींना अलिबागच्या मुख्य न्यायदंडाधिकारी यांनी दोषी ठरवले आहे. घरफोडीतील मुख्य आरोपीला पाच वर्ष सक्त मजुरीची शिक्षा आणि पाच हजारांचा दंडही ठोठावला. संदीप रामकेशव निषाद आणि संगीता आसाराम काजले अशी शिक्षा सुनावण्यात आलेल्या दोघांची नावे आहेत.

अलिबाग तालुक्यातील चोंढी येथे ही घटना घडली होती. फिर्यादी ऋषिकेश विजय वेलणकर यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, २०२१ मध्ये ते व त्यांची आई घरात झोपलेले असताना अज्ञात चोरट्याने घराच्या मागील बाजूचा लोखंडी दरवाज्याची कडी काढून व आतील लाकडी दरवाजा उघडून घरात प्रवेश केला. त्यानंतर सोन्या-चांदीचे दागिने आणि रोख रक्कम चोरी करून नेली होती. याप्रकरणी मांडवा सागरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. तत्कालीन पोलीस उपनिरीक्षक जे आर पाटील यांनी या गुन्ह्याचा तपास करून दोघांना अटक केली होती. अलिबागच्या मुख्य न्यायदंडाधिकारी यांच्या न्यायालयात दोषारोपत्र दाखल करण्यात आले होते. न्यायालयाने दोन्ही आरोपींना दोषी ठरवले. या प्रकरणातील आरोपी संदीप निषाद याला पाच वर्षे सक्तमजुरी व पाच हजार रुपये दंड, तसेच कलम ३८० अंतर्गत तीन वर्षे सक्तमजुरी व पाच हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावण्यात आली. तर संगीता काजळे हिला तीन वर्षे सक्तमजुरी व पाच हजार रुपये दंडा ठोठावण्यात आला.

## पोलादपूर कचरा डेपो हटविण्यासाठी उपोषणाचा इशारा

**पोलादपूर : प्रतिनिधी**

पोलादपूर बस स्टँड शेजारील रयत शिक्षण संस्थेच्या जुन्या इमारतीच्या प्रांगणात बेकायदेशीरपणे सुरु करण्यात आलेला कचरा डेपो त्वरित हटविण्याबाबत एसटी स्थानक परिसरातील जनतेने उपोषणाचा इशारा दिला आहे. स्थानिक नागरिकांनी हे निवेदन नगरपंचायतीचे मुख्याधिकारी विनय शिपाई यांना दिले. या निवेदनाच्या प्रती पोलादपूर तहसीलदार कार्यालय आणि महाड प्रांताधिकारी कार्यालयात देण्यात आल्या आहेत.




पोलादपूर बस स्टँड परिसरात राहणाऱ्या नागरिकांनी प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी दिलेल्या निवेदनात या कचरा डेपोमुळे संपूर्ण परिसरात अत्यंत दुर्गंधी पसरती असून नागरिक व प्रवासी जनतेला दुर्गंधीचा त्रास सहन करावा लागत असल्याने आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. या कचरा डेपोमुळे डास, माश्या आणि मोकाट प्राण्यांचा सुळसुळाट झाला आहे. परिणामी, परिसरातील लहान मुले, महिला आणि वृद्ध नागरिकांना मलेरिया, डेंग्यू आणि श्वसनाचे गंभीर आजार झाल्याच्या तक्रारी येत आहेत.

त्यामुळे हा कचरा डेपो घनकचरा व्यवस्थापन नियम आणि पर्यावरण कायद्यांचे थेट उल्लंघन करणारा असल्याने नागरी वस्तीमधील हा कचरा डेपो त्वरित आणि कायमचा बंद करण्यात यावा. सर्व कचरा उचलून ती जागा स्वच्छ व जंतूमुक्त करण्यात यावी. भविष्यात या भागात पुन्हा कचरा टाकला जाणार नाही, याची लेखी हमी देण्यात यावी,

या प्रमुख मागण्यांसह प्रशासनाने या समस्येची गंभीर दखल घेऊन पुढील ४ दिवसांच्या आत हा कचरा डेपो न हटविल्यास लोकशाही मार्गाने आमरण उपोषण आंदोलन करण्याशिवाय पर्याय उरणार नाही, असा इशारा या निवेदनाद्वारे देण्यात आला आहे. एसटी स्थानक परिसरातील ४० महिला पुरुष नागरिकांनी या निवेदनावर सही केली आहे.

## पेण पालिकेच्या शेकडो कर्मचाऱ्यांनी घेतला आरोग्य शिबिराचा लाभ

**पेण : प्रतिनिधी**

पेण नगरपरिषद आणि डॉ आर एन पाटील, सूरज हॉस्पिटल सानपाडा यांच्या संयुक्त विद्यमाने आणि महिला व बालकल्याण सभापती कलावती पाटील यांच्या संकल्पनेतून पेण नगरपरिषदेच्या सफाई कामगार तसेच कर्मचाऱ्यांसाठी करण्यात आलेल्या आरोग्य शिबिरात पालिकेच्या शेकडो कर्मचाऱ्यांनी सहभागी होऊन लाभ घेतला. यावेळी बोलताना नगराध्यक्षा प्रितम पाटील यांनी आमच्या पालिकेतील सफाई कामगार हा शहराचा सर्वात महत्वाचा घटक आहे,शहर निरोगी आणि स्वच्छ ठेवण्यासाठी त्यांचा सिंहाचा वाटा असल्याचे सांगितले.



जुलैच्या पहिल्याच आठवड्यात झालेल्या ढगफुटी सदृश पाऊस आणि अतिरुष्टीमुळे पेण शहरात अनेक ठिकाणी कचरा अडकल्यानंतर गटारे तुंबलेली असताना स्वतःचा कोणताही विचार न करता हे सफाई कामगार आपल्या कामाचे कर्तव्य बजावत होते. हे सर्व जिवंत आणि थरारक चित्र पालिकेच्या महिला व बालकल्याण सभापती कलावती पाटील यांनी पाहिल्यानंतर या मेहनती सफाई कामगारांच्या आरोग्याचा विचार करून नगराध्यक्षा प्रितम पाटील यांचे मार्गदर्शन घेऊन पालिका सफाई कर्मचारी आणि त्यांच्या कुटुंबियांसाठी मोफत आरोग्य तपासणी व औषधे वाटप शिबिराचे आयोजन केले होते. सदर शिबिराला कर्मचाऱ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभागी होऊन आपल्या मेंदूचे आजार, मणक्याचे आजार, मानसिक आजार, हृदयविकार,ईसीजी, ब्लड शुगर, कमी ऐकायला येणाऱ्यांसाठी ऑडिमेट्री टेस्ट आदी समस्यांबाबत उपचार करून घेतले आणि त्यांना मोफत औषधे देखील वाटप करण्यात आली.

माझा शहर म्हणजे माझा कुटुंब या भावनेने आम्ही सर्व लोकप्रतिनिधी काम करत असताना आम्ही शहरवासीयांची जी जबाबदारी खांद्यावर घेत असतो ती याच सफाई कामगारांमुळेच.आपला शहर स्वच्छ आणि निरोगी राहील हा नागरिकांना शब्द आम्ही या सफाई कामगारांमुळेच देत असतो असे स्पष्ट मत नगराध्यक्षा प्रितम पाटील यांनी सफाई कामगारांबाबत गौरौद्गार गौरोउदगार काढताना व्यक्त केले.यावेळी शिबिरामध्ये मुख्याधिकारी जीवन पाटील,कर व शुल्क सभापती सुनीता जोशी, बांधकाम सभापती स्मिता माळी, क्रीडा व शिक्षण सभापती अफ्रिन आखवारे, पाणीपुरवठा सभापती आनंद जाधव, नगरसेविका सुशीला ठाकूर, जास्मिन पाटील, अजय क्षीरसागर, मितेश शहा, आरोग्य अधिकारी दयानंद गावंड,युवा नेते ललित पाटील, हितेश पाटील यांसह पालिकेचे अधिकारी वर्ग उपस्थित होता. यावेळी पेण उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी देखील उपस्थित होते.

## रायगडच्या श्रेया कुंटे यांची भाजप महिला मोर्चाच्या प्रदेश सचिवपदी नियुक्ती



**नागोठणे : बातमीदार**

भारतीय जनता पार्टी महिला मोर्चाच्या प्रदेश कार्यकारिणीची घोषणा शुक्रवार (दि. २४) रोजी करण्यात आली असून, रायगड जिल्ह्यातील महिला नेत्या श्रेया केदार कुंटे यांची भाजप महिला मोर्चाच्या प्रदेश सचिवपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

या नियुक्तीबद्दल भाजप महिला मोर्चाच्या प्रदेशाध्यक्षा आमदार चित्रा किशोर वाघ यांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

प्रदेशाध्यक्षा चित्रा वाघ यांनी प्रसिद्ध केलेल्या शुभेच्छा संदेशात म्हटले आहे की, प्रत्येक पद हे केवळ सन्मानाचे नसून जनसेवा, संघटन आणि कार्यकर्त्यांचा विश्वास जपण्याची मोठी जबाबदारी घेऊन येते. रायगडच्या श्रेया कुंटे या ही जबाबदारी समर्थपणे पार पाडतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. तसेच भाजप प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली महिला मोर्चाचे संघटन अधिक मजबूत करण्याबरोबरच राज्य सरकारच्या जनकल्याणकारी योजना व उपक्रम तळागाळातील शेवटच्या घटकापर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्याचे कार्य श्रेया कुंटे करतील, असा विश्वासही चित्रा वाघ यांनी व्यक्त केला.

रायगड जिल्ह्यातील महिला नेतृत्वाला मिळालेल्या या महत्त्वपूर्ण संधीमुळे भाजप कार्यकर्त्यांमध्ये आनंदाचे वातावरण असून, विविध स्तरांतून श्रेया कुंटे यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

पान १ वरुन

## शेतकऱ्यांच्या सक्षमीकरणासाठी सरकार कटिबद्ध -मंत्री आशिष शेलार

यामुळे अशा कठीण काळात शासनाने शेतकऱ्यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहणे ही काळाची गरज आहे आणि हे लक्षात घेऊन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली केंद्र सरकारने शेतकऱ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अनेक महत्त्वपूर्ण योजना सुरू केल्या आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र शासनानेही त्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी करत शेतकऱ्यांना प्रत्यक्ष लाभ मिळवून दिला आहे. या केवळ घोषणा नसून त्यांची यशस्वी अंमलबजावणी करण्यात आली आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.

पीएम-किसान सन्मान निधी, प्रधानमंत्री पीक विमा योजना, कृषी यांत्रिकीकरण, शेतीसाठी आवश्यक खते व साहित्याची उपलब्धता, बाजारपेठेचा विस्तार, सिंचन सुविधा आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर यांसारख्या विविध उपक्रमांमुळे शेतकरी अधिक सक्षम होत आहे. शेतीला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देत पुढील पिढीसाठी शेती अधिक सुरक्षित, शाश्वत आणि फायदेशीर करण्याचे काम सरकार करत असल्याचे मंत्री ॲड. शेलार यांनी सांगितले. पूर्वी युरिया खरेदीसाठी शेतकऱ्यांना तासन्तास रांगेत उभे राहावे लागत होते, परंतु पंतप्रधान नरेंद्र मोदींनी या समस्येकडे गांभीर्याने लक्ष देत खत वितरण व्यवस्था अधिक पारदर्शक आणि सुलभ केली. त्याचबरोबर शेतकऱ्यांना आवश्यक सुविधा वेळेत उपलब्ध करून देण्यावर सरकारने विशेष भर दिला असल्याचे त्यांनी नमूद केले.

राज्यातील शेतकऱ्यांना सरसकट दोन लाख रुपयांपर्यंतची कर्जमाफी देण्याचा ऐतिहासिक निर्णय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतला. त्याचबरोबर शेतकऱ्यांच्या वीजबिल माफीचा निर्णयही मोठा दिलासा देणारा ठरला आहे. या निर्णयांमुळे लाखो शेतकऱ्यांच्या आर्थिक अडचणी कमी झाल्या असून त्यांना नव्याने उभारी मिळाली आहे. त्यामुळे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार आणि महायुती सरकारला जनतेचे आशीर्वाद लाभत असल्याचे मंत्री आशिष शेलार यांनी सांगितले. यावेळी त्यांनी विधानसभेत सातत्याने शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर आवाज उठविणारे भाजपचे महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस तथा आमदार प्रशांत ठाकूर आणि आमदार महेश बालदी यांच्या कार्याचे कौतुक करताना या लोकप्रतिनिधींनी वेळोवेळी शेतकऱ्यांचे प्रश्न प्रभावीपणे विधानसभेत मांडले असून त्यांच्या कार्यातून शेतकऱ्यांविषयीची तळमळ आणि आस्था स्पष्टपणे दिसून येते, असे अधोरेखित केले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली केंद्र सरकारने 'पीएम-किसान सन्मान निधी', प्रधानमंत्री पीक विमा योजना, माती आरोग्य पत्रिका, ई-नाम, सूक्ष्म सिंचन, नैसर्गिक शेती आणि कृषी क्षेत्रातील डिजिटल परिवर्तन यांसारख्या अनेक योजनांद्वारे शेतकऱ्यांच्या जीवनात सकारात्मक बदल घडवून आणले आहेत. या योजनांची प्रभावी अंमलबजावणी महाराष्ट्रात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली होत असून शेतकरी आत्मनिर्भरकडे वाटचाल करत असल्याचे आमदार प्रशांत ठाकूर यांनी नमूद केले.

अटल सेतू संपल्यावर टोलनाकाजवळील डोंगरावर शिवमुद्रा उभारण्याची मागणी आमदार महेश बालदी यांनी केली होती, त्याला मंत्री आशिष शेलार यांनी मान्यता दिली असल्याचेही आमदार प्रशांत ठाकूर यांनी यावेळी सांगितले.

मेळाव्याचे प्रास्ताविक जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांनी केले. ते म्हणाले की, आज आपण सर्वजण एका अत्यंत महत्त्वपूर्ण आणि ऐतिहासिक प्रसंगाचे साक्षीदार आहोत. महाराष्ट्रातील लाखो शेतकरी कुटुंबांना मोठा दिलासा देणारा सरसकट दोन लाख रुपयांपर्यंतच्या कर्जमाफीचा निर्णय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील महायुती सरकारने घेतला आहे. हा निर्णय केवळ आर्थिक मदत नसून शेतकऱ्यांच्या आत्मविश्वासाला नवी उभारी देणारा आहे. रायगड जिल्हा किसान मोर्चाच्या वतीने आयोजित या कृतज्ञता मेळाव्याचा उद्देश सरकारने शेतकरी हितासाठी घेतलेल्या निर्णयांबद्दल कृतज्ञता व्यक्त करणे तसेच शासनाच्या विविध कृषी कल्याणकारी योजनांची माहिती शेतकरी बांधवांपर्यंत पोहचवणे हा आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली केंद्र सरकारने आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्य सरकारने शेतकऱ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अनेक महत्त्वपूर्ण योजना राबवल्या आहेत आणि आता कर्जमाफीसारखे ऐतिहासिक निर्णय यामुळे शेतकऱ्यांच्या जीवनात सकारात्मक बदल घडत आहेत, असेही त्यांनी सांगितले.

मेळाव्याच्या निमित्ताने उपस्थित शेतकऱ्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील सरकारने घेतलेल्या कर्जमाफीच्या निर्णयाचे स्वागत करत सरकारप्रती कृतज्ञता व्यक्त केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दीपक बेहेरे यांनी केले, तर उपस्थितांचे आभार सागर सांगडे यांनी मानले.

## ...त्या विद्यार्थिनीचा उपचारादरम्यान मृत्यू

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महानगरपालिकेच्या कचरा वाहतूक घंटागाडीने दिलेल्या भीषण धडकेत गंभीर जखमी झालेल्या श्रेया फिरके (१८) या विद्यार्थिनीचा उपचारादरम्यान दुर्दैवी मृत्यू झाला आहे. सीबीडी बेलापूर येथील अपोलो रुग्णालयात तिच्यावर उपचार सुरू होते, मात्र उपचारांना प्रतिसाद न मिळाल्याने तिची शुक्रवारी पहाटे प्राणज्योत मालवली. यामुळे घनकचरा विभागातील चालकांकडून बेदरकारपणे चालवल्या जाणाऱ्या वाहनांचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.या दुर्दैवी घटनेनंतर महापालिकेच्या घनकचरा विभागाचे उपायुक्त अजय गडदे यांनी दिलेल्या माहितीनुसार, जखमी विद्यार्थिनीच्या उपचाराचा उर्वरित वैद्यकीय खर्च महापालिकेच्या माध्यमातून देण्यात आला आहे. यापूर्वी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने (मनसे) याप्रकरणी आक्रमक भूमिका घेत उपचाराचा संपूर्ण खर्च संबंधित ठेकेदाराकडून वसूल करून तातडीने मदत देण्याची मागणी पालिका आयुक्तांकडे केली होती. त्यानुसार एकूण १० लाख रुपये श्रेयाच्या कुटुंबीयांना कंत्राटदाराकडून देण्यात आले होते.


### महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

ई निविदा सूचना क्रमांक २४/२०२६-२०२७ (मुंबई)

म.औ.वि.महामंडळातर्फे खालील कामांकरीता ई निविदा सूचना मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम रुपये |
|---|---|---|
| १ | दिघी बंदर-आधारित औद्योगिक क्षेत्रात 'Critical Mineral Processing Park' विकसित करण्यासाठी सल्लागाराची नियुक्ती करण्याबाबतचा प्रस्ताव विनंती अर्ज (RFP)....(दुसरी मागणी) | -- |

उपरोक्त कामांबाबत निविदा प्रपत्र दिनांक २५/०७/२०२६ ते दिनांक ३०/०७/२०२६ पर्यंत https://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध असतील.

इच्छुकांनी वरील कामांबाबत दिनांक २७/०७/२०२६ पूर्वी त्यांचे प्रश्न वर नमुद संकेत स्थळावर नोंदवावेत. कंत्राटदारांच्या मुद्यांचे निराकरण /महामंडळाचा खुलासा दिनांक २८/०७/२०२६ पासून वर नमुद संकेत स्थळावर उपलब्ध होईल.

# रेल्वेच्या एसी डब्यातील सराईत चोर जेरबंद

## २६.३१ लाखांचे दागिने हस्तगत

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल धावत्या एक्स्प्रेस गाड्यांच्या वातानुकूलित (एसी) डब्यांमध्ये प्रवाशांच्या बॅगा आणि मौल्यवान ऐवज चोरणाऱ्या सराईत चोराला पनवेल रेल्वे पोलिसांनी अटक करून २६ लाख ३१ हजार ६८ रुपयांचे सोन्या-चांदीचे दागिने जप्त केले आहेत. गेल्या तीन महिन्यांपासून विविध राज्यांतील रेल्वे पोलिसांकडून त्याचा शोध सुरू होता, मात्र पनवेल रेल्वेस्थानकावरील नियमित तपासणीदरम्यान पोलिसांच्या सतर्कतेमुळे तो अखेर जाळ्यात अडकला. तपासात आरोपीविरोधात मुंबई रेल्वेसह देशातील विविध राज्यांमध्ये रेल्वे चोरीचे ३९ गुन्हे दाखल असल्याचे उघड झाले असून, गोवा रेल्वे पोलीस ठाण्यातही त्याच्याविरोधात १० गुन्ह्यांची नोंद आहे.

मुंबईतील रेल्वेवरील घातपाताच्या पार्श्वभूमीवर रेल्वे पोलीस आयुक्त राकेश कलासागर यांच्या निर्देशानुसार मेल व एक्स्प्रेस गाड्यांमधून उतरणाऱ्या संशयित प्रवाशांवर सीसीटीव्हीच्या माध्यमातून लक्ष ठेवले जात आहे. आवश्यकतेनुसार त्यांच्याकडील सामानाची तपासणी करून शस्त्रे किंवा संशयास्पद वस्तूंची पडताळणी केली जाते. त्यासाठी वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजय तायडे यांनी एक अधिकारी व पाच कर्मचाऱ्यांचे विशेष पथक पनवेलमध्ये नियुक्त केले आहे.



या पथकाने मंगला लक्षद्वीप एक्स्प्रेस (१२६१७) पनवेल स्थानकाच्या पाचव्या फलाटावर आल्यानंतर एसी डब्यातून घाईघाईने उतरलेल्या संशयित व्यक्तीला अडवले. पोलिस उपनिरीक्षक एस. एम. पाटील, पोलिस हवालदार सोमनाथ इंगवले आणि कदम यांनी त्याची चौकशी केली. त्याच्या बॅगेच्या झडतीत मोठ्या प्रमाणात सोन्या-चांदीचे दागिने आढळून आले.

सुरुवातीला आरोपीने पत्नीशी वाद झाल्याने तिचे दागिने विकण्यासाठी घेऊन जात असल्याचे सांगितले. मात्र दागिन्यांमध्ये एका जोडीत एकच कानातले असल्याने पोलिसांना संशय आला. त्याला ताब्यात घेतल्यानंतर त्याने दागिने पोलिसांकडे ठेवून तेथून पळून जाण्याचाही प्रयत्न केला. त्यानंतर त्याचा गुन्हेगारी इतिहास तपासण्यात आला असता विविध रेल्वे पोलिस ठाण्यांत त्याच्याविरोधात ३९ चोरीचे गुन्हे नोंद असल्याचे स्पष्ट झाले. पोलिस निरीक्षक एन. बी. यमगर, महिला सहाय्यक पोलिस निरीक्षक बी. एन. पुरी आणि पोलिस उपनिरीक्षक एस. डी. यादव यांनी केलेल्या सखोल चौकशीत त्याने रेल्वे प्रवाशांच्या बॅगा चोरल्याची कबुली दिली.

अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव रघू सुमन खोसला (वय ४१, रा. लोनी देहात, गाझियाबाद, उत्तर प्रदेश; मूळ रा. पंजाब) असे आहे. तो एसी डब्यातील आर्थिकदृष्ट्या सक्षम प्रवाशांना हेरून उशाजवळ किंवा शेजारी ठेवलेल्या बॅगा चोरत असे. चोरी केल्यानंतर तो प्रत्येकवेळी सिमकार्ड बदलत असे आणि मुंबई किंवा नवी मुंबई विमानतळावरून विमानाने हैदराबादसह उत्तरप्रदेश अशा विविध शहरांमध्ये पळ काढत असल्याचे तपासात उघड झाले आहे.

जप्त दागिन्यांची माहिती मुंबई रेल्वे नियंत्रण कक्षामार्फत देशभरातील रेल्वे पोलिसांना देण्यात आली. त्यानंतर कोकण रेल्वे पोलिस, मडगाव यांनी हे दागिने त्यांच्या हद्दीतील नेत्रावती एक्स्प्रेसमधील चोरीच्या गुन्ह्यातील असल्याची माहिती पनवेलच्या पोलिसांना दिली. या प्रकरणात जेरिल स्कायरिया हे कुटुंबासह केरळला जात असताना त्यांच्या पत्नीच्या उशाजवळ ठेवलेली सोन्या-चांदीचे दागिने व आयफोन असलेली हँडबॅग चोरीला गेली होती. न्यायालयाच्या आदेशानंतर आरोपीला पुढील तपासासाठी गोवा रेल्वे पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले.या कारवाईनंतर आयुक्त राकेश कलासागर यांनी एक्स्प्रेस गाड्यांबरोबरच लोकल रेल्वेमधील संशयित प्रवाशांवरही अधिक बारकाईने लक्ष ठेवण्याचे निर्देश पनवेल पोलिसांना दिले. बेलापूर ते रोहा या रेल्वे मार्गावरील स्थानकांच्या सुरक्षेची जबाबदारी पनवेल रेल्वे पोलिसांकडे असून सुमारे १०८ अधिकारी व कर्मचारी ही जबाबदारी सांभाळत आहेत.

# सेतू कार्यालय परिसरात एजंटांचा वावर; कामकाजात अडथळा

## कारवाई करण्याची नागरिकांकडून मागणी

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल तहसील कार्यालयातील सेतू सुविधा केंद्र सध्या नागरिकांच्या मदतीसाठी की एजंटांचे खायचे दुकान, असा सवाल उपस्थित होत आहे. सेतू कार्यालयाच्या आवारात एजंटांचा प्रचंड सुळसुळाट वाढला असून, नागरिकांची उघडउघड अडवणूक आणि फसवणूक करून मलाई लाटण्याचे प्रकार मोठ्या प्रमाणावर सुरू आहेत.

विविध दाखले, कागदपत्रे आणि शासकीय कामांसाठी येणाऱ्या सर्वसामान्य नागरिकांना सरळ मार्गाने काम करणे कठीण झाले आहे. "आम्ही अधिकाऱ्यांच्या ओळखीचे आहोत, तुमचे काम एका दिवसात करून देतो," असे सांगून एजंट नागरिकांकडून हजारो रुपये उकळत आहेत.

विशेष म्हणजे, पुरवठा कार्यालयातील अधिकारी कर्मचारी यांना याबाबत विचारणा केली असता कर्मचारी नियमानुसार मूळ अर्जदाराची मागणी करतात, तेव्हा "अर्जदार आले नाहीत, आम्ही त्यांचेच काम घेऊन आलोय,आम्ही सामाजिक कामे करतो काम करूनच द्या!" अशी अरेरावी हे एजंट कार्यालयात करतात असे सांगितले आहे. ओळखीचा सुगावा देऊन आणि राजकीय किंवा इतर दबाव आणून कामे पदरात पाडून घेण्याचा सपाटा या एजंटांनी लावला आहे.

काम नसेल होत तर क्लायंटला खिडकीत पाठवून गर्दी केली जाते. कागदपत्रांची पातळीची प्रक्रियेत चुकामूक झाल्याने बांगलादेशी रेशन कार्ड कसे बनतात ह्याचे उदाहरण दिसते. या बाबत पुरवठा कार्यालयात अनेकदा विवाद होताना दिसले आहे. या त्रासाबद्दल कार्यालयाने वरिष्ठांना माहिती दिली असल्याचे समजते

शासकीय नियमांनुसार अत्यंत कमी शुल्कात होणाऱ्या कामांसाठी हे एजंट च्या संगनमताने महा ई सेवा केंद्र सामान्य नागरिकांची आर्थिक फसवणूक करत जनतेकडून अव्वाच्या सव्वा पैसे वसूल करत आहेत.नवीन रेशनकार्ड आता शासकीय संकेतस्थळा वरुन सुविधा मिळाली मात्र ह्याचा फायदा महा ई सेवा केंद्र घेत आहेत. ह्यावर कोणाचेही नियंत्रण नाही असे दिसते आहे.

ग्रामीण भागातून किंवा दूरवरून येणाऱ्या अशिक्षित व गरजू नागरिकांना कार्यालयाच्या परिसरात उभे राहून फॉर्म भरण्यास मदत करतो सांगून नागरिकांना जाळ्यात ओढले जाते ऑनलाईन करण्यास ठराविक सेवा केंद्राकडे पाठवून तेथे ३ ते ४ हजार उकळले जात आहे. सर्वसामान्य अर्जदारांची मोठी आर्थिक फसवणूक होत असून, प्रशासनाच्या प्रतिमेलाही मोठा धक्का बसत आहे.

या प्रकारामुळे प्रामाणिकपणे काम करणाऱ्या अधिकाऱ्यांवरही नाहक ताण येत असून अरेरावी करणाऱ्या एजंटांवर प्रशासनाने आणि पोलिसांनी कडक कारवाई करण्याची मागणी जोर धरू लागली आहे.

# कळंबोलीत भव्य रक्तदान शिबिर




**पनवेल : रामप्रहर वृत्त**

राज्याचे यशस्वी मुख्यमंत्री. देवेंद्र फडणवीस साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त भाजपा कळंबोली मंडळाच्या वतीने भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. हे शिबिर मंडळ अध्यक्ष अमर अरुण पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली मोठ्या उत्साहात व सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून संपन्न झाले.

या रक्तदान शिबिराला पनवेलचे लोकप्रिय आमदार प्रशांत दादा ठाकूर यांनी सदिच्छा भेट देऊन रक्तदात्यांचे मनोबल वाढविले. तसेच उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष. अविनाश कोळी यांनीही शिबिराला भेट देऊन आयोजकांचे व कार्यकर्त्यांचे कौतुक केले.

यावेळी उपमहापौर प्रमिला ताई पाटील, जिल्हा चिटणीस रविनाथ पाटील, नगरसेवक रवींद्र भगत, नगरसेवक राजेंद्र शर्मा, नगरसेविका दमयंती भोईर, मनाली ठाकूर, सरस्वती कथारा, सरचिटणीस दिलीप बिष्ट, उपाध्यक्ष मनोरंजन सिंह, चिटणीस नीलेश भोईर, केशव यादव, विलास किथे, अमर ठाकूर, युवा मोर्चा अध्यक्ष गौरव नाईक, प्रभाग अध्यक्ष राम महानवर, घनश्याम शर्मा तसेच सर्व सेल, मोर्चा व प्रकोष्ठांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# गोदामातून आठ एअर पिस्तूल, रायफलीची चोरी

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल तालुक्यातील साई गाव येथील एका नामांकित कंपनीच्या गोदामातून पाच एअर पिस्तूल आणि तीन एअर रायफलींची चोरी झाल्याची घटना उघडकीस आली आहे. या शस्त्रांची किंमत सुमारे एक लाख ६० हजार रुपये असून पनवेल तालुका पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरोधात गुन्हा दाखल करून तपासाला सुरुवात केली आहे.साईगाव येथील कॅपिटल लँड प्रा. लि. या गोदामात कंपनीच्या एअर रायफल्स आणि एअर पिस्तूलचा साठा होता. २० ऑक्टोबर २०२५ ते २९ मे २०२६ या कालावधीत अज्ञात चोरट्याने येथे शिरून या मौल्यवान शस्त्रांची चोरी केली. गोदामातील साहित्याची काही दिवसांपूर्वी अंतर्गत मोजणी करण्यात शशिकांत भंडारे (५०) यांनी पनवेल तालुका पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली.

# मोगरा फुलला संगीत कार्यक्रम रंगला; मंत्री आशिष शेलार यांची उपस्थिती

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त जे. एम. म्हात्रे चॅरिटेबल ट्रस्ट यांच्या वतीने मोगरा फुलला या विशेष संगीत सोहळ्याचे भव्य आयोजन करण्यात आले होते. संत ज्ञानेश्वर महाराजांच्या जीवनचरित्रावर आधारित असलेल्या या ज्ञान, भक्ति आणि संगीताचा अद्वितीय मिलाफ असणाऱ्या कार्यक्रमाला पनवेलकरांचा उदंड प्रतिसाद मिळाला.

पनवेल येथील आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात गुरुवारी हा सोहळा झाला. या प्रसंगी महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक कार्य आणि माहिती तंत्रज्ञान मंत्री अ‍ॅड. आशिष शेलार आणि माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांची प्रमुख उपस्थिती लाभली होती. या कार्यक्रमात व्याख्याते गणेश शिंदे यांनी संत ज्ञानेश्वर महाराजांच्या जीवनचरित्रावर आणि त्यांच्या शिकवणीवर अत्यंत भावपूर्ण निरूपण केले, तर गायिका सन्मिता धापटे-शिंदे यांनी सादर केलेल्या विठ्ठल भक्तीने अभंग आणि भक्तीगीतांनी संपूर्ण नाट्यगृह भक्तिरसात न्हाऊन निघाले. 'विठ्ठल गीतीं गावा,



विठ्ठल चित्तीं ध्यावा' या भावनेने रसिकांनी या संगीतमय संध्याचा नितांत आनंद लुटला.

या यशस्वी कार्यक्रमाचे नियोजन भाजपचे ज्येष्ठ नते जे.एम.म्हात्रे, माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे आणि महिला व बालकल्याण सभापती ममता म्हात्रे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते. याप्रसंगी भाजपचे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, ज्येष्ठ नेते जे.एम.म्हात्रे, महापौर नितीन पाटील, जिल्हा परिषदेचे अध्यक्ष मंगेश वाकडीकर, पनवेल महापालिकेचे सभागृह नेते अ‍ॅड. प्रकाश बिनेदार, माजी सभागृह नेते प्रीतम म्हात्रे, महिला व बालकल्याण सभापती ममता म्हात्रे, नगरसेवक अजय बहिरा, दिलीप पाटील, सुमित झुंझारराव, खालापूर पंचायत समितीचे सभापती कृष्णा परांगे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर, पदाधिकारी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# एमएनएम विद्यालयात आषाढी एकादशीनिमित्त दिंडी सोहळा उत्साहात



**गव्हाण : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या एम.एन.एम. विद्यालय व टी.एन.जी. कनिष्ठविज्ञान विद्यालयात आषाढी एकादशीनिमित्त पारंपरिक दिंडी सोहळ्याचे भक्तिमय वातावरणात उत्साहपूर्णआयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांमध्ये भक्ती, संस्कार, सामाजिक ऐक्य आणि भारतीय संस्कृतीचीजपणूक व्हावी, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात शाळेच्या प्राचार्या सायली वडवलकर यांच्या हस्ते पालखी पूजनाने करण्यात आली. त्यानंतर शाळेच्या पर्यवेक्षिका प्रणीता गोळे यांच्या हस्ते श्री विठ्ठल-रुक्मिणी यांच्या प्रतिमेचेपूजन करण्यात आले, तसेच पर्यवेक्षक अरुण सर यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून दिंडी सोहळ्याचा शुभारंभ करण्यात आला.

यावेळी विद्यार्थ्यांनी अभंग, भजन, नृत्य, नाटिका आणि आरती सादर करून आषाढी एकादशीचे महत्त्वप्रभावीपणे विषद केले. वारकरी संप्रदायाची परंपरा आणि संतांच्या विचारांचे महत्त्व विद्यार्थ्यांनी आपल्यासादरीकरणातून सुंदररीत्या उलगडून दाखविले.यानंतर विद्यार्थ्यांची दिंडी शाळेपासून श्री विठ्ठल मंदिर, कोपर येथे नेण्यात आली.मंदिरात दर्शन घेतल्यानंतर सर्वांनी सामूहिक आरती करून विठ्ठलाच्या चरणी प्रार्थना अर्पण केली.या कार्यक्रमाचे उत्कृष्ट आयोजन शाळेच्या सांस्कृतिक विभागाच्या प्रमुख वैशाली जोशी, नर्सिला कांबळे आणि पूजा कुमारी यांच्या नेतृत्व व सहकार्याने करण्यात आले. तसेच सर्व शिक्षकांनी आकर्षकसजावट, शिस्तबद्ध नियोजन आणि विविध उपक्रमांच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी मोलाचे योगदानदिले.

या कार्यक्रमास शाळेच्या प्राचार्या सायली वडवलकर, पर्यवेक्षिका प्रणीता गोळे, पर्यवेक्षक अरुणसर, सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. या उपक्रमामुळेविद्यार्थ्यांना वारकरी संप्रदाय, आषाढी एकादशीचे महत्त्व आणि भारतीय संस्कृतीतील भक्तीपरंपरेचीप्रत्यक्ष अनुभूती मिळाली. कार्यक्रम भक्तिमय वातावरणात अत्यंत उत्साहात संपन्न झाला.

# 'सर्वस्पर्शी व्यक्तिमत्व विद्यार्थी जीवनातच घडते'



**उरण : बातमीदार**

महाविद्यालयात विद्यार्थी विकासाच्या दृष्टिकोनातून विविध अभ्यासक्रम सुरू केलेले आहेत.महाविद्यालयीन शिक्षण घेताना अभ्यासासोबतच सर्वांगीण विकास व कौशल्य आत्मसात करण्याकडे विद्यार्थ्यांनी लक्ष द्यावे, त्यासाठी विविध लघु अभ्यासक्रम सहाय्यभूत ठरतील, सर्वस्पर्शी विकासा साठी विद्यार्थी जीवनात सदर अभ्यासक्रमांचा विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा असे आवाहन येथील प्राचार्य डॉ आमोद ठक्कर यांनी मानसशास्त्र विभागाच्या वतीने चालवल्या जाणाऱ्या व्यक्तिमत्व विकास लघु अभ्यासक्रमाचे उद्घाटन करताना केले.

या वेळी रेखा देशपांडे,कुसुम ठाकूर,कुंदा पाटील,ललिता पाटील, रजनी पाटील उपस्थित होते. कॅप्टन लक्ष्मी सेहगल यांच्या स्मृती दिनानिमित्त त्यांच्या प्रतिमेस यावेळी अभिवादन करण्यात आले .

# करंजा मच्छीमार बंदरातील गाळ काढून मच्छीमारांना दिलासा देण्याची मागणी

**उरण : प्रतिनिधी**

मासेमारी हंगामात सुमारे ५०० कोटींची मासळीची निर्यात करणारे अद्यावत करंजा मच्छिमार बंदर आता मोठ्या प्रमाणावर साचलेल्या गाळाच्या समस्येमुळे आणखीनच अडचणीत आले आहे.१५ ऑगस्टपर्यंत गाळाची समस्या कायमची सोडविण्यात आली नाही तर सुरू होणाऱ्या मासेमारी हंगामच धोक्यात येणार आहे.यामुळे मच्छिमारांवर उपासमारीचे संकट येऊन ठेपणार असल्याची भिती मच्छिमारांकडून व्यक्त केली जात आहे.

येत्या १५ ऑगस्टपासून मासेमारीचा हंगामाला सुरुवात होणार आहे.पावसाळी मासेमारी बंदी नंतर तब्बल ७६ दिवसांनी मच्छिमार बोटी मासेमारीसाठी खोल समुद्रात रवाना होणार आहेत.यासाठी रायगड जिल्ह्यातील १००० बोटी क्षमतेचे अत्याधुनिक करंजा मच्छिमार बंदरही सज्ज होण्याच्या तयारीत आहे, मात्र रायगड जिल्ह्यातील हजारो रांसाठी वरदान ठरु राहाणारे २५६ कोटी रुपये खर्चून उभारण्यात आलेले करंजा मच्छिमार बंदर मागील वर्षभरापासून गाळाने भरण्यास सुरुवात झाली आहे.गाळाच्या समस्येमुळे हजारो मच्छिमारांना ओहोटीच्या वेळी बंदरात मासळी उतरविण्यासाठी येणाऱ्या आणि बंदरातुन मासळी उतरवून पुन्हा बाहेर जाण्यासाठी मच्छिमारांना बंदरात बाहेरच चार- चार तास समुद्रातच वाट पाहावी लागते. यामुळे बंदरात आणि बंदराबाहेर शेकडो बोटी गाळात अडकून पडतात.बंदरातील



गाळाची समस्या अद्यापही कायम असल्याने मासेमारी हंगामातच मासेमारी बोटींना बंदरात येजा करण्यासाठी आता ६ ते ८ तासांचा कालावधी लागणार असल्याने मच्छिमारांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागणार आहे.

याआधीच या मच्छिमार बंदराची उंची कमी असल्याने मच्छिमार बोटी क्षतीग्रस्त होण्याच्या प्रमाणात वाढ झाली आहे.त्याशिवाय बंदरात पाणी,वीज, अंतर्गत रस्ते, स्वच्छता गृह,लिलाव केंद्र,बर्फ, वेळेवर न मिळणारे डिझेल परतावे आणि इतर अनेक पायाभूत समस्याही भेडसावित आहेत.

करंजा मच्छिमार बंदरातील गाळ काढणे व इतर काही पायाभूत सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी १८३ कोटी रुपये खर्चाचा प्रस्ताव मंजूर करण्यात आला आहे.मात्र तीन वर्षांत अद्यापही निधीचा ठावठिकाणा नाही. कामासाठी वेळेत निधी उपलब्ध होऊ शकलेला नाही.यामुळे बंदरातील गाळ व पायाभूत सोयीसुविधांचे काम रखडले आहे.मात्र यामुळे मात्र मच्छीमारांची गैरसोय होत आहे.करंजा मच्छिमार बंदरातुन आता पावसाळी मासेमारी बंदीचा हंगाम वगळता सुमारे ५०० कोटींची मासळी निर्यात होऊ लागली आहे.

गाळाच्या आणि पायाभूत सुविधांच्या समस्येमुळे मासळी व्यावसायिक संकटात सापडले आहेत.लोकप्रतिनिधी व शासनाकडून पोकळ आश्वासनांखेरीज काहीही हाती लागत नसल्याने मच्छिमारांना अनेक समस्यांचा सामना करावा लागत आहे.शासनावर अवलंबून न राहता काही समस्या सोडवण्यासाठी मच्छीमार बोटींकडून प्रत्येक ट्रीपमागे एक हजार रुपये तर सप्लायर्सकडून वर्षाकाठी ३० हजार रुपये वर्गणी गोळा केली जात आहे.या वर्गणीतुनच आतापर्यंत बंदरात दोन कोटी खर्चाची आवश्यकतेनुसार कामे करण्यात आली असल्याची माहिती वेस्ट कोस्ट पर्ससीन नेट फिशरमेन वेल्फेअर असोसिएशनचे संचालक रमेश नाखवा यांनी दिली.

आता तर गाळाची समस्या कायम असल्याने मच्छीमार बोटी बंदरात येण्याचा कालावधी ६-८ तासांपर्यंत अधिक वाढणार असल्याने मासळी व्यावसायिकांवर विपरीत परिणाम होणार आहे.

## संपादकीय

# संवाद की संघर्ष?

शिक्षणमंत्र्यांच्या राजीनाम्यानंतर विद्यार्थ्यांचे प्रश्न सुटणार का या प्रश्नाचे उत्तर दिल्लीतील आंदोलक नेत्यांकडे नाही. नीट परीक्षेसंबंधी व्यवस्थेत नेमक्या कोणत्या सुधारणा त्यांना अपेक्षित आहेत याबद्दलही ते बोलत नाहीत. निव्वळ आपल्या आंदोलनाला सोशल मीडियाच्या माध्यमातून उग्र रूप देण्याचे काम कॉक्रोच जनता पार्टीने केले आहे. आणि अस्तित्व लयाला चाललेल्या विरोधीपक्षांनी त्यातून स्वतःला सावरण्याचा खटाटोप चालवला आहे.

**परीक्षा व्यवस्थेवरील जनतेचा विश्वास अबाधित ठेवण्यासाठी केंद्र सरकार कठोर पावले उचलणार असल्याचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गुरुवारी रात्री उशीरा प्रसारित केलेल्या व्हिडिओ संदेशातून स्पष्ट केले. पेपरफुटी हा सामान्य विषय नसून विद्यार्थी आणि पालकांसाठी ती अतिशय वेदनादायी बाब असल्याचेही पंतप्रधान यावेळी म्हणाले. त्यांनी दोषींवर अधिक कठोर कारवाई, जलदगती न्यायालयीन प्रक्रिया आणि परीक्षा व्यवस्थेला अधिक पारदर्शक बनविण्याचा निर्धारही व्यक्त केला. हा केवळ राजकीय प्रतिसाद नव्हता तर विद्यार्थ्यांची वेदना समजून घेण्याचा प्रामाणिक प्रयत्न होता. पेपरफुटी रोखण्यासाठी कडक कायदा करण्याची घोषणाही पंतप्रधानांनी यावेळी केली. नीट पेपरफुटी प्रकरणी दिल्लीत विद्यार्थ्यांच्या आंदोलनामुळे राजकीय वातावरण तापले आहे. विरोधी पक्ष सतत या मुद्यावरून सरकारची कोंडी करण्याचा प्रयत्न करत आहेत. केंद्र सरकारने मात्र संघर्षाऐवजी शुक्रवारी पुन्हा आंदोलनकर्त्यांच्या प्रतिनिधींशी संवादाचा मार्ग स्वीकारला. केंद्रीय मंत्र्यांनी कॉक्रोच जनता पार्टीच्या प्रतिनिधींशी चर्चा केली आणि त्यांच्या काही मागण्या मान्य करण्याची तयारी दाखविली. आंदोलनात सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांवर अनावश्यक दंडात्मक कारवाई होणार नाही तसेच परीक्षा व्यवस्थेतील सुधारणांबाबत पुढील प्रक्रिया वेगाने राबविण्याचे आश्वासन देण्यात आले. सरकारच्या सकारात्मक भूमिकेनंतरही सीजेपीने मात्र आंदोलन कायम ठेवण्याचा व केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा न घेतला गेल्यास आंदोलन अधिक व्यापक व उग्र करण्याचा आक्रमक पवित्रा घेतला आहे. यामुळे आता आंदोलनाचा भर परीक्षा सुधारणांवर नसून एका व्यक्तीच्या राजीनाम्याभोवती राजकीय संघर्ष उभा केला जात असल्याचे स्पष्ट दिसते आहे. त्यामुळे नीट परीक्षेवरून हे आंदोलन थेट पंतप्रधानांवर टीका करण्यापर्यंत जाऊन पोहोचले आहे. खरे तर नीट पेपरफुटी प्रकरणी सरकारने तातडीने दोषींना अटक केली. परीक्षा रद्द करून तपास सीबीआयकडे सोपवण्यात आला. यशस्वीरित्या नव्याने परीक्षा घेण्यात आली. परंतु या साऱ्याकडे दुर्लक्ष करून जेन झीच्या आंदोलनातून भारताचा नेपाळ, बांगलादेश आणि श्रीलंका करण्याची स्वप्ने काही जण पाहात आहेत असे दिसते. खरे तर विद्यार्थ्यांना आवश्यक आहे ती पारदर्शक परीक्षा व्यवस्था, पेपरफुटी रोखण्यासाठी प्रभावी यंत्रणा, दोषींना कठोर शिक्षा आणि भविष्यात अशा घटना पुन्हा घडणार नाहीत याची हमी. असे असताना केवळ एका मंत्र्याने राजीनामा दिल्याने जणु काही या समस्या आपोआप सुटतील असे म्हणणे अजिबातच वास्तववादी नाही. आंदोलन हे लोकशाहीतील महत्त्वाचे साधन आहे. परंतु संवाद आणि सकारात्मक तोडगा हेही लोकशाहीचे आधारस्तंभ आहेत हे लक्षात घेतले जायला हवे. सरकारने सुधारणा आणि संवादाचा मार्ग स्वीकारला असताना त्या प्रक्रियेला संधी देणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांच्या भवितव्याचा प्रश्न राजकारणापेक्षा मोठा आहे. नीट परीक्षेतील गैरप्रकारांमुळे विद्यार्थ्यांमध्ये निर्माण झालेला संताप समजून घेण्यासारखा असला तरी त्या संतापाचे रूपांतर निव्वळ राजकीय संघर्षात होत असेल तर त्यातून विद्यार्थ्यांचे हित साधले जाईल का?**

# तो हा विठ्ठल बरवा, तो हा माधव बरवा...

महाराष्ट्रासह इतरही काही राज्यातील गोरगरीब भाविकांचे आराध्य दैवत असलेला पंढरीचा पांडुरंग अर्थातच भक्तजनांची विठू माऊली म्हणजे भक्ती-भावाचा महासंगमच होय.. या पवित्र भक्ती संगमाचा पाईक होऊन पांडुरंग चरणी नतमस्तक होण्याचे भाग्य मला लाभले होते.

पुणे विभागात माहिती उपसंचालक म्हणून नियुक्ती झाल्यानंतर विभागांतर्गत असलेल्या पंढरपूर येथे आषाढी एकादशीला प्रसिध्दी विषयक कामकाजाचा भाग म्हणून महापूजेच्या वेळी मी तेथे उपस्थित होतो. तेथील नियम आणि राजशिष्टाचारानुसार मुख्य पूजा विधीवत संपन्न झाली. महापूजा झाल्यामुळे माऊलीचे रूप अधिकच तेजस्वी विलोभनीय भासले.

*रुप पाहता लोचनी, सुख झाले हो साजणी,*
*तो हा विठ्ठल बरवा, तो हा माधव बरवा,*
*बहूत सुकृताची जोडी म्हणूनी विठ्ठल आवडी*

अगदी असेच रुप मला दिसले मनी भावले. आषाढी एकादशीला महापूजेच्या वेळी मंदिरात अगदी गाभाऱ्यात प्रत्यक्ष उपस्थित राहून मुख्य पूजेचा तो अलौकिक अविस्मरणीय सोहळा ज्याची देही याची डोळा पाहता आला... काय वर्णू महिमा तयाचा हो, असाच तो क्षण होता. पहाटेच्या मंगल, भक्तिमय वातावरणामध्ये सर्वत्र विठू माऊलीच्या गजर होत असताना मी जेव्हा माऊलीचे दर्शन घेतले त्यावेळेस अश्रूंच्या धारा वाहत होत्या. मनभरून आले होती. भेटी लागी जीवा... लागलीसी आस.. याचा प्रत्यय क्षणो क्षणी येत होता. माऊलीच्या मूर्तीचे नव्हे तर प्रत्यक्ष माऊलीदर्शन झाल्याचा भास, आभास आणि विश्वास पुढील भेटीच्या आशेने हृदयाच्या कुपीत साठवून ठेवला. अश्रू दाटल्यामुळे काही अंधुक दिसत होते.. माऊलीचे चरणस्पर्श करताना आई-वडिलांचा चेहरा विठू चरणी भासला. याआधी बऱ्याचदा पंढरपुरी गेलो होतो, पण तेथील तेथील गर्दीचा महासागर पाहून केवळ नामदेव पायरीचे व कळस दर्शन घेऊन मार्गस्थ झालो, पण आषाढीचे ते दर्शन मम भाग्यच... वाडवडिलांची पुण्याई म्हणूनच हे आषाढीला दर्शन झाले अशा शब्दात अनेक ज्येष्ठांनी या दर्शनासंबंधी आपली टिप्पणी केली... मी जरी शासकीय अधिकारी म्हणून त्या दिवशी भाग्यवान ठरलो असलो तरी महापूजेच्या वेळी दर्शन रांगेतील एक वारकरी जोडपंदेखील मुख्यमंत्री महोदयांच्या समवेत महापूजेस बसतात.. त्यांना ते भाग्य लाभते तसेच मोठ्या भक्तिभावाने लाखोंच्या



संख्येने ऊन वारा, पाऊस याची तमा न बाळगता विठूचा गजर येणाऱ्या व माऊलीचे दर्शन करणाऱ्या भाविकांच्या भाग्याचा हेवा वाटल्याशिवाय राहत नाही.

### महापूजेचे महत्त्व

आषाढी एकादशीला राज्याचे मुख्यमंत्री तर कार्तिकीला उपमुख्यमंत्री यांच्या हस्ते पांडूरंग आणि रखुमाईची महापूजा होते. तुळशी माळांनी अलंकारित होऊन विठू माऊली,रखमाई सजते आणि मग त्यानंतर भक्तीच्या महापूराला विठू माऊलीचे चरणस्पर्श दर्शनाचा योग लाभतो. या महापुजेच्या वेळी अहोरात्र सुरू असलेली भाविकांची दर्शन रांग अल्प काळ थांबवली जाते. राज्याच्या मुख्यमंत्र्यांसोबतच माऊलीचे भक्त असलेल्या त्या रांगेतील अग्रणी क्रमांकाच्या वारकरी दाम्पत्यास महापूजेचा योग येतो. अकस्मातपणे लाभलेल्या या पुजेच्यामुळे आपले जीवन कृतार्थ झाल्याचा भाव त्या मानाच्या वारकरी दांपत्यास निश्चितच होतो, किंबहूना तो तसे बोलूनही दाखवतो. तद्नंतरच्या कार्यक्रमात मुख्यमंत्री महोदयांच्या हस्ते त्या वारकरी नवरा बायकोस सन्मानित केले जाते. विठ्ठल रुक्माई ची मोठी मूर्ती, वस्त्र, शाल, साडीचोळी आहेर तसेच राज्य परिवहन महामंडळाच्या म्हणजे एसटीचा एक वर्षाचा मोफत पास त्यांना दिला जातो.. हेही एक आगळे-वेगळेपण महापूजेचे..

### आषाढी कार्तिकी भक्तजन

आषाढी कार्तिकी भक्तजन येती-चंद्रभागेमध्ये स्नान जे करिती.. हजारो वर्षांची आपली वारीची परंपरा जपत दिंडीच्या माध्यमातून लाखो भाविकांचा मेळा या पंढरीच्या सागरास मिळतो तो क्षण अलौकिकच. संत ज्ञानेश्वर माऊली, संत तुकाराम माऊली, संत मुक्ताबाई, संत एकनाथ महाराज, संत सोपानदेव, संत निवृत्तीनाथ, शेगावचे गजानन महाराज यांच्या पालख्या आपणास माहीत आहेतच. वारीसाठी पुणे जिल्ह्यातून चार, नाशिक, जळगाव, औरंगाबाद, सोलापूर, अमरावती आणि अहमदनगर जिल्ह्यातून प्रत्येकी एकप्रमाणे महत्त्वाच्या दहा-बारा मुख्य पालख्यांसह महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून लहान मोठ्या हजारो दिंडी, वारकरी संप्रदाय साधारण २० ते २५ दिवस ऊन, वारा, पाऊस याची तमा न बाळगता विठूरायाच्या दर्शनाच्या ओढीने चालत असतात. वारीला आल्यावर घरचा कसलाही विचार नाही केवळ माऊली दर्शनाची ओढ असते असे वारकरी सांगतात. गरीब-श्रीमंत, अंध-अपंग, दिव्यांग, स्त्री-पुरुष, तरुण-वयस्कर काहीही भेदभाव आपल्याला तेथे जाणवत नाही. केवळ आणि केवळ विठू माऊलीचे दर्शन हा एकच ध्यास असतो. वारीत असलेला प्रत्येक जण हा माऊलीमयच झालेला असतो. देहभान विसरुन, जाती-भेद न मानता सगळेच बोलावा विठ्ठला, पहावा विठ्ठल,करावा विठ्ठल, जिवेभावे असे म्हणत तल्लीन होऊन विठ्ठलाचे दर्शन घेतात...

धार्मिकतेबरोबरच विविध सामाजिक उपक्रमाच्या दिंड्याही त्या ठिकाणी दाखल होतात. यात पर्यावरण, वृक्ष लागवड, आरोग्य असे विषय असतात. पनवेल मनपाने या वर्षी अवयवदान या महत्त्वपूर्ण विषयाला दिंडीच्या माध्यमातून जनसामान्यांपर्यंत पोहचविण्याचा प्रयत्न केला आहे.

विठू माऊली तू... माऊली जगाची...
माऊलीत मूर्ती विठ्ठलाची...
विठ्ठला मायबापा...

कविवर्य गीतकार जगदीश खेबुडकर यांनी केलेल्या माऊलींच्या वर्णनालाप्रमाणे विठ्ठलाच्या मूर्तीतून माऊलीचे प्रेम लाखो भाविकांना लाभते.

अवघे गरजे पंढरपूर... पंढरपूर म्हटले की पांडूरंग, श्री विठ्ठल, अर्थातच विठू माऊलीचे रुप नजरेसमोर येते. कळत-नकळत मुखातून रामकृष्ण माऊलीचा उच्चार होतो. ही बाब मलाच नव्हे तर अनेकांना अनुभवयास आली आहे.

युगे अठ्ठावीस विटेवरी उभा,
वामांगी रखुमाई दिसे दिव्य शोभा
तुळसीमाळा गळां कर ठेऊनि कटी
कासे पितांबर कस्तुरी लल्लाटी

येथे आलेला भाविक जेव्हा कपाळावर बुक्का लावून पांडूरंगाच्या नावाने गंध साकारतो तेव्हा त्याच्या चेहऱ्यावर देखील पांडूरंगाचे प्रत्यक्ष रूप साकारते तसा भास पाहताना होतो. म्हणूनच कि काय कदाचित त्याठिकाणी प्रत्येकजण वयाचा विचार न करता एकमेकांचे चरणस्पर्श करत माऊली म्हणत प्रेमांलिगन देतात. चंद्रभागेमध्ये स्नान करताना प्रत्येक भाविक आपल्या मनातील आणि शरीरावरील त्याज्य बाबी चंद्रभागेला अर्पण करुन तन मनाने स्वच्छ होऊन विठूच्या दर्शनासाठी मंदिराकडे येतात. त्यांच्या डोळ्यातही माऊलीच्या दर्शनाची ओढ आपणास दिसते.

**-डॉ. राजू पाटोदकर, मुख्य जनसंपर्क अधिकारी, पनवेल महानगरपालिका**



## बदलते तंत्रज्ञान

### ग्राहकांच्या संख्येत Jio अव्वल, पण कमाईत Airtel सरस!

जिओ आणि एअरटेल या देशातील दोन सर्वात मोठ्या दूरसंचार कंपन्या असून दोन्ही कंपन्यांमध्ये ग्राहकांसाठी मोठी स्पर्धा सुरू आहे. ग्राहकसंख्येच्या बाबतीत जिओ देशातील सर्वात मोठी टेलिकॉम कंपनी आहे, मात्र प्रत्येक ग्राहकाकडून मिळणाऱ्या सरासरी उत्पन्नाच्या बाबतीत एअरटेल आघाडीवर आहे. ताज्या आकडेवारीनुसार जिओच्या तुलनेत जवळपास पाच कोटी ग्राहक कमी असूनही एअरटेलचा 'ॲव्हरेज रेव्हेन्यू पर यूजर' (ARPU) अधिक आहे.




दूरसंचार क्षेत्रात ARPU हा कंपन्यांच्या कामगिरीचा एक महत्त्वाचा निकष मानला जातो. एखादी टेलिकॉम कंपनी प्रत्येक ग्राहकाकडून दरमहा सरासरी किती उत्पन्न मिळवते, हे ARPUच्या माध्यमातून समजते. ARPU अधिक असण्याचा अर्थ कंपनीचे ग्राहक प्रीमियम प्लॅन, अधिक डेटा आणि इतर मूल्यवर्धित सेवांसाठी जास्त पैसे खर्च करत आहेत. ग्राहकांची संख्या कोट्यवधींमध्ये असल्याने ARPUमध्ये झालेली छोटीशी वाढदेखील कंपनीच्या एकूण उत्पन्नात मोठी भर घालू शकते.

जिओचा ARPU सध्या २१५.६० रुपये आहे. वर्षभरापूर्वी तो २०८.०८ रुपये होता. याउलट एअरटेलचा ARPU २५७ रुपये आहे. याचा अर्थ एअरटेल प्रत्येक ग्राहकाकडून दरमहा जिओच्या तुलनेत सरासरी ४१.४० रुपये म्हणजेच सुमारे १९.२ टक्के अधिक उत्पन्न मिळवत आहे.

जिओ ५३.३ कोटी ग्राहकांसह भारतातील सर्वात मोठी दूरसंचार कंपनी आहे. यापैकी सुमारे २८.५ कोटी ग्राहक ५G सेवा वापरत आहेत. दुसरीकडे एअरटेलच्या एकूण ग्राहकांची संख्या ४८.३ कोटी आहे. म्हणजेच जिओच्या तुलनेत एअरटेलकडे जवळपास ५ कोटी ग्राहक कमी आहेत. असे असतानाही प्रत्येक ग्राहकाकडून मिळणाऱ्या सरासरी उत्पन्नाच्या बाबतीत एअरटेल जिओपेक्षा पुढे आहे.

दिलेल्या ग्राहकसंख्या आणि ARPUच्या साध्या गणनेनुसार, जिओकडून दरमहा सुमारे ११,४९८ कोटी रुपयांचे उत्पन्न मिळू शकते, तर एअरटेलसाठी हा आकडा सुमारे १२,४३४ कोटी रुपये इतका ठरतो, मात्र ही ARPU आणि नमूद ग्राहकसंख्येवर आधारित साधी गणना असून कंपन्यांच्या प्रत्यक्ष एकूण महसुलाशी हा आकडा थेट जुळेलच असे नाही. रिपोर्ट्सनुसार एअरटेलच्या ग्राहकांमध्ये प्रीमियम सेवा वापरणाऱ्यांचे प्रमाण अधिक आहे. त्याचबरोबर कंपनीच्या ग्राहकांमध्ये पोस्टपेड ग्राहकांचाही मोठा वाटा आहे.

# अभिजात संगीतकार सुधीर फडके

## निमित्त



सुधीर फडके हे मराठी आणि हिंदी चित्रपटसृष्टीतील एक प्रसिद्ध गायक, संगीतकार होते. ते विशेषत: मराठी सुगम संगीतासाठी प्रसिद्ध होते. त्यांचा जन्म २५ जुलै १९१९ रोजी कोल्हापूर येथे झाला. फडके यांनी अनेक अजरामर गीते संगीतबद्ध केली आहेत. त्यांची अनेक भक्तीगीते, सुगम संगीत आणि चित्रपट गीते प्रचंड लोकप्रिय आहेत.

कवी ग.दि. माडगूळकर लिखित गीतरामायणाला फडके यांनी संगीत दिले.ते खूप लोकप्रिय झाले. फडके यांनी यातील सर्व ५६ गाणी संगीतबद्ध केली. सुधीर फडके यांनी वामनराव पाध्ये यांच्याकडून शास्त्रीय गायन संगीताचे प्रारंभिक प्रशिक्षण घेतले. त्यांनी १९४१ मध्ये आपल्या संगीत कारकिर्दीला सुरुवात केली. त्यानंतर पाच वर्षांनी ते प्रभात फिल्म कंपनीत संगीत दिग्दर्शक म्हणून रुजू झाले.


एच.एम.व्ही. कंपनीत त्या काळी अनेक प्रतिभावंत येत असत. हिराबाई बडोदेकर, माणिक दादरकर, वासंती, पद्मा पाटणकर (याच पद्मा पाटणकर पुढे सौ. गदिमा झाल्या), सरस्वती राणे, जे. एल. रानडे, यांच्या साठी गाणी करण्याची संधी बाबूजींनी याच काळात घेतली. हिराबाई बडोदेकर यांना ते गुरुस्थानी मानत. पण त्यांनी सर्व समजून संगीतकार म्हणेल त्या पद्धतीने गाणी रेकॉर्ड केली, हे बाबूजी आदरपूर्वक नमूद करतात. 'विनवीत शबरी रघुरायाला' आणि 'नाच रे ब्रिजलाला' ही हिराबाईंची गाणी खूप लोकप्रिय झाली होती. एच.एम.व्ही.शी निर्माण झालेल्या या संबंधामुळे एक दिवस त्यांचा संबंध 'प्रभात'शी आला. संगीतकार बाबूजींचा पहिला चित्रपट होता- 'गोकुल'! आणि येथूनच बाबूजींची संगीतकार म्हणून प्रतिमा तयार झाली. 'रुक्मिणी-स्वयंवर', आगे बढो', सीता स्वयंवर, संत जनाबाई इत्यादी चित्रपटामुळे ते प्रकाशात आले.

फडके यांनी २१ हिंदी चित्रपटांसह १११ चित्रपटांना संगीत दिले. रुक्मणी स्वयंवर, वंदे मातरम, निरुपमा आणि परिराणी, दोस्त असा तर असा, शापित, चोराच्या मनात चांदणे, आधार, बाजीरावांचा बेटा, जावई विकत घेणे आहे, अनोळखी, कार्तिकी, या सुखानो या, जोतिबाचा नवस, आराम हराम आहे, आपले दात आपले ओठ, थोरली जाऊ, पुढचं पाऊल आणि धाकटी सून हे त्यांनी संगीत दिलेले काही चित्रपट आहेत.

संगीत दिग्दर्शनासोबतच सुधीर फडके यांनी नरवीर तानाजी, पोस्टातील मुली, आंधळा मागतो एक डोळा, जगाच्या पाठीवर, ते माझे घर, आम्ही जातो आमच्या गावा यांसारख्या चित्रपटांमध्ये गायन केले. त्यांनी 'मराठा स्फूर्ती गीत' हे भारतीय सैन्याच्या रेजिमेंट, मराठा लाईट इन्फंट्रीचे रेजिमेंटल गाणे तयार केले.

फडके यांना 'हा माझा मार्ग एकला', या मराठीतील सर्वोत्कृष्ट चित्रपटाचा राष्ट्रीय पुरस्कार (१९६३), संगीत नाटक अकादमी पुरस्कार (१९९१) आणि सह्याद्री स्वररत्न पुरस्कार (२००२) यांसह अनेक पुरस्कारांनी गौरविण्यात आले. सुधीर फडके यांनी गोवा स्वातंत्र्य चळवळीत सक्रिय भाग घेतला होता. ते अमेरिकेतील इंडिया हेरिटेज फाऊंडेशनचे संस्थापक सदस्यदेखील होते. अशा या ख्यातनाम संगीतकाराचे २९ जुलै २००२ रोजी मुंबईत निधन झाले. (साभार : इंटरनेट)


## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

# पेरुमुळे रक्तातील साखर ठेवता येते नियंत्रित

फळे आपल्या शरीराला अत्यंत आवश्यक असे पोषण प्रदान करतात. परंतु तज्ज्ञांच्या मते, फळांच्या पानांमध्येही अनेक पोषक घटक असतात. पेरूच्या पानांमध्ये रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित करण्यास मदत करणारे जास्त पोषक घटक असतात. दिल्लीतील सी. के. बिर्ला हॉस्पिटलमधील अंतर्गत औषध विभागाचे प्रमुख सल्लागार डॉ. नरंदर सिंगला यांनी पेरू, पेरूपासून तयार केलेली चाट आणि पेरूच्या पानांचे रक्तातील साखरेवर होणारे परिणाम याबाबतची माहिती दिली.



पेरूचा ग्लायसेमिक इंडेक्स तुलनेने कमी असतो, ज्यामुळे मधुमेह असलेल्या लोकांसाठी तो एक चांगला पर्याय आहे.परंतु, अर्ध्याहून अधिक पिकलेले पेरू जास्त प्रमाणात खाल्ल्याने रक्तातील साखरेची पातळी वाढू शकते, असे डॉ. सिंगला म्हणाले.

पेरू चाट : कमीत कमी साखर आणि मसाल्यांचा वापर करून बनवल्यास पेरू चाट हा एक आरोग्यदायी पर्याय ठरू शकतो. पेरूला जास्त मीठ, साखर किंवा मसाले लावून खाल्ल्याने त्याचे आरोग्यदायी फायदे कमी होऊ शकतात, असे डॉ. सिंगला म्हणाले.

### पेरूची पाने

डॉ. सिंगला यांच्या मते, पेरूच्या पानांचा रक्तातील साखरेच्या पातळीवर सकारात्मक परिणाम दिसून आला आहे. कारण- ते आतड्यांमध्ये शोषल्या जाणाऱ्या ग्लुकोजला रोखू शकतात आणि इन्सुलिन उत्पादनास उत्तेजन देऊ शकतात. तुम्ही पेरूच्या पानांचे सेवन चहा किंवा अर्काच्या स्वरूपात करू शकता.

### रक्तातील साखर कमी करते

प्राणी आणि मानवी अभ्यासात पेरूची पाने रक्तातील साखरेची पातळी कमी करतात, असे आढळून आले आहे.

इन्सुलिन संवेदनशीलता सुधारते : पेरूची पाने इन्सुलिन संवेदनशीलता सुधारण्यास मदत करू शकतात, ज्यामुळे टाईप २ मधुमेह होण्याचा धोका कमी होतो.अँटिऑक्सिडंट गुणधर्म : पेरूची पाने अँटीऑक्सिडंट्सने समृद्ध असतात, जे ऑक्सिडेटिव्ह ताण आणि जळजळ होण्यापासून संरक्षण करण्यास मदत करतात.सावधगिरी बाळगा

पेरूच्या सेवनामुळे तुमच्या रक्तशर्करेच्या पातळीवर प्रतिकूल परिणाम होत नाही ना याची खात्री करण्यासाठी तुमच्या रक्तातील साखरेची पातळी नियमितपणे तपासा.

# नेरळ तीन दिवस अंधारात; 'महावितरण'वर धडक

**नेरळ : प्रतिनिधी**

गेली तीन दिवस नेरळ शहर अंधारात असताना महावितरणच्या कारभाराविरोधात अखेर नेरळकरांच्या संयमाचा बांध फुटला. वीजपुरवठा सुरळीत करण्यास महावितरण प्रशासन अपयशी ठरल्याचा आरोप करत शंभर ते दीडशेहून अधिक संतप्त नागरिक, महिला आणि युवकांनी आज थेट नेरळ महावितरण कार्यालयावर धडक दिली. यावेळी नागरिकांनी कार्यालयाचा कारभार काही काळ बंद पाडत 'वरिष्ठ अधिकारी घटनास्थळी येऊन ठोस आश्वासन देत नाहीत, तोपर्यंत कार्यालय सोडणार नाही', असा आक्रमक पवित्रा घेतला.

महावितरणच्या या कारभाराचा जाब विचारण्यासाठी नेरळमधील महिला, युवक आणि नागरिक मोठ्या संख्येने कार्यालयात जमा झाले होते. यावेळी अनेक नागरिकांनी आपल्या भागातील वीजपुरवठा, तक्रारींना मिळणारा प्रतिसाद आणि अधिकारी-कर्मचाऱ्यांकडून फोन न उचलण्याच्या समस्याही मांडल्या. त्यामुळे काही काळ महावितरण कार्यालयात तणावाचे वातावरण निर्माण झाले.दरम्यान, नेरळ जिल्हा परिषद सदस्या सुनीता मोरे यांनीही घटनास्थळी उपस्थित राहत नागरिकांच्या समस्या जाणून घेतल्या.

घटनेची माहिती मिळताच कर्जत विधानसभा मतदारसंघाचे आमदार महेंद्र



थोरवे यांनीही महावितरण कार्यालयात येत नागरिकांची भेट घेतली. यावेळी त्यांनी अधिकाऱ्यांना नागरिकांच्या प्रश्नांवरून चांगलेच सुनावले. मनुष्यबळ आणि कामगारांची कुमक तातडीने वाढवून शहरातील वीजपुरवठा सुरळीत केला जाईल असे अश्वासन दिल्यावर जमाव शांत झाला.

## शाळेत जाणाऱ्या दोन विद्यार्थिनींना विजेचा शॉक

शाळेत जाणाऱ्या दोन विद्यार्थिनींना सकाळच्या सुमारास विद्युत पोलजवळ साचलेल्या पाण्यात विजेचा प्रवाह उतरल्याने शॉक लागल्याची धक्कादायक घटना घडली. दोन्ही विद्यार्थिनींना तातडीने स्थानिक रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. तीन दिवस वीजपुरवठा बंद आणि त्याचवेळी पाण्यात करंट उतरल्याची घटना घडत असल्याने महावितरणच्या कारभारावर नागरिकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली.

## पोलादपूरनजीक तीन वाहनांचा अपघात

**पोलादपूर : प्रतिनिधी**

मुंबई गोवा महामार्गावर शुक्रवारी सकाळी ९ वाजता पोलादपूर बस स्थानकातून बोरीवलीकडे जाणाऱ्या एसटी गाडीची महामार्गावरील हॉटेल राजमुद्रा जवळ चिपळूण बदलापूर एसटी बस आणि टेम्पोला मागून धडक बसली. या धडकेमुळे बसमधील काही प्रवाशांच्या नाका तोंडाला किरकोळ मार लागला असून या अपघाताची कोणतीही तक्रार दाखल नाही.

पोलादपूर बस स्थानकातून पोलादपूर बोरिवली ही बस महाड दिशेला जात असताना हॉटेल राजमुद्रा जवळ आली. यावेळी त्या बसपुढे असणाऱ्या चिपळूण बदलापूर बसला ब्रेक न लागल्याने वाहक बाजूला ठोकर बसली. चिपळूण बदलापूर या बसने देखील पुढे असणाऱ्या मालवाहतूक करणाऱ्या टेम्पोला मागून धडक दिल्याने तिहेरी अपघात झाला.

महामार्गावर अचानक मोकाट गुरे आल्याने त्यांना वाचविण्यासाठी माल वाहतूक करणाऱ्या टेम्पोने वेग कमी हळू केल्यानंतर त्या पाठोपाठ येणाऱ्या चिपळूण बदलापूर बसनेसुद्धा वेग नियंत्रित केला. मात्र, त्या मागून येणाऱ्या पोलादपूर बोरिवली वरील चालकाला नियंत्रण ठेवता न आल्याने अपघाता घडला.

## साळाव जिंदल विद्यामंदिर येथे पदग्रहण सोहळा

**मुरुड : प्रतिनिधी**

जिंदल विद्या मंदिर, साळाव येथे गुरुवारी, नुकताच 'पदग्रहण व वार्षिक गुणगौरव सोहळा' अत्यंत उत्साहपूर्ण आणि प्रेरणादायी वातावरणात पार पडला. शाळेचे प्राचार्य मुकेश ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली, उपप्राचार्य मंगेश बामनोटे आणि सहशालेय उपक्रम प्रमुख श्रीमती अफीह बाशा यांच्या उत्तम नियोजनाखाली हा कार्यक्रम यशस्वीरीत्या संपन्न झाला.

या सोहळ्यास मुख्य अतिथी म्हणून 'आरोही जे.एस.डब्ल्यू. महिला मंडळा'च्या अध्यक्षा कामिनी चंद्रा उपस्थित होत्या. तसेच सन्माननीय अतिथी प्रसिद्ध समाजसेविका नीलू मलिक, विशेष अतिथी मीनाक्षी ठाकूर, चंचल तेलंग, सुमन सिंग आणि स्नेहा म्हात्रे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष पंकज मलिक यांनी कार्यक्रमाच्या उत्कृष्ट आयोजनाचे विशेष कौतुक केले.

कार्यक्रमाची सुरुवात नवनिर्वाचित बाल प्रतिनिधी मंडळाच्या शिस्तबद्ध आणि रुबाबदार पथसंचलनाने झाली. मान्यवरांच्या हस्ते नवनियुक्त बालनेत्यांना सन्मानचिन्हे व पट्टे प्रदान करून कर्तव्याची शपथ देण्यात आली. त्यानंतर विद्यार्थ्यांनी सादर केलेली नाटिका, विविध नृत्यप्रकाराने उपस्थितांची मने जिंकली.

## ज्येष्ठ कीर्तनकार हभप बाळकृष्ण महाराज पाटील यांचे निधन

**मोहोपाडा : प्रतिनिधी**



वारकरी संप्रदायातील ज्येष्ठ कीर्तनकार, प्रवचनकार, उत्कृष्ट मृदुंगवादक आणि अध्यात्मिक मार्गदर्शक रसायनी चांभार्ली येथील गुरुवर्य ह.भ.प. बाळकृष्ण महाराज पाटील यांचे वयाच्या ९१ व्या वर्षी, अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनाची वार्ता वाऱ्यासारखी परिसरात पसरताच संपूर्ण रसायनीपाताळगंगा परिसरावर शोककळा पसरली.

गुरुवर्य बाळकृष्ण महाराज यांनी आपले संपूर्ण आयुष्य वारकरी संप्रदायाच्या प्रसारासाठी, समाजप्रबोधनासाठी आणि हरिनामाच्या सेवेसाठी समर्पित केले. ते ब्रह्मलीन ह.भ.प. कांबेकर महाराज यांचे पट्टशिष्य होते. गुरूंच्या ब्रह्मलीन झाल्यानंतर त्यांनी त्यांच्या विचारांचा, तत्त्वांचा आणि परंपरेचा वारसा समर्थपणे पुढे नेला. गुरुपरंपरेचे जतन करत त्यांनी आयुष्यभर अखंड हरिनाम, कीर्तन सेवा आणि समाजप्रबोधनाचे कार्य निष्ठेने केले..त्यांच्या पश्चात पत्नी, मुले, मुली, नातवंडे, विस्तृत आप्तपरिवार तसेच असंख्य वारकरी शिष्य आणि भक्तपरिवार असा मोठा परिवार आहे.


**MAHATRANSCO**
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**e-TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (e-Tender) from reputed and registered contractors on Mahatransco e-Tendering Website **https://srmetender.mahatransco.in/** for the following Tender specification.

| RFX | Description | Esti. Cost |
|---|---|---|
| Tend. 9/26-27 RFX 7000040494 ... 3rd call | Work of AMC for servicing / repairing / overhauling of various make 36kV breaker and supply of parts for the same at various S/stn under EHV (O&M) Circle, Panvel for the F.Y. 26-27 & 27-28 **Tender Fee: Rs. 5000/- + GST** | Limited to Rs. 150.00 Lakhs |

EMD 1 % of estimated cost. **Submission of bids from 24.07.2026 to 03.08.2026 up to 11:00 hrs, Opening date: 03.07.2026 @ 11:30 Hrs.**
For further details visit our website **https://srmetender.mahatransco.in/**
**Contact Person:** The Executive Engineer (Adm)
**Tel No.** 022- 27459624, **Mob. No.** 8412050202
**E-mail ID** se7200@mahatransco.in

**Sd/-**
**Superintending Engineer,**
**EHV (O&M) Circle, Panvel**



**पनवेल महानगरपालिका**
तालुका – पनवेल, जिल्हा – रायगड ४१०२०६

**ई–निविदा सूचना**
**मलनिःस्सारण विभाग**

मा. आयुक्त, पनवेल महानगरपालिका यांच्या वतीने ई–निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) ब–१ नमुन्यातील खालील कामाची निविदा महाराष्ट्र शासनाकडील नोंदणीकृत संस्था, ठेकेदार किंवा नोंदणीकृत कंपनी, भागीदारी कंपनी नोंदणीकृत LLP कायदा २००८ अंतर्गत संबंधितांकडून मागविण्यात आली आहे.

| अनु. क्र. | निविदा क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम (GST वगळून) | निविदा अनामत रक्कम (रू) | कोरी ई निविदा किंमत (रू) |
|---|---|---|---|---|---|
| १ | PMC/SEWERAGE/65/2026-27 | केंद्र शासन पुरस्कृत अमृत २.० अभियानाअंतर्गत ''जल ही अमृत'' उपक्रमाअंतर्गत पनवेल येथील १४ द.ल.ली. क्षमतेच्या मलप्रक्रिया केंद्रामध्ये Decanter, Centrifuge and Automatic Gas Chlorination System पुर्नस्थापित करणेबाबत. | रु.१,६१,३५,६६८/- | १,५०,०००/- | २,३६०/- |

या कामाच्या ई–निविदेबाबतची माहिती शासनाच्या http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दिनांक २७/०७/२०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात येईल.
संबंधित निविदाधारकांनी याची नोंद घ्यावी.
दिनांक : २४/०७/२०२६
जा.क्र.पमपा/मल.वि./२२२५/प्र.क्र.०३/६८०/२०२६

**सही /–**
**अतिरीक्त आयुक्त (I)**
पनवेल महानगरपालिका



**जाहीर नोटीस**

**उप विभागीय अधिकारी पनवेल उपविभाग पनवेल यांच्या न्यायालयात**
On Admission आरटीएस अपिल क्र................ /२०२५

१. श्रीमती. हमीदा कमरुद्दीन तेली
रा. हाजी हमीदा कंपाऊन्ड, ॲड. तेली ऑफीसजवळ, देवरी पाडा, कोसा, मुंब्रा, ता. जि. ठाणे
२. श्रीमती. जमिला समद शेख, ३. श्रीमती. रहिमा मेहबुब शेख
४. श्रीमती. आनिसा इकबाल शेख, ५. श्री. अकबर यासीन शेख
६. श्रीमती. मन्नन यासिन शेख, क्र. २ ते ६ रा. छत्रपती शिवाजी शाळा वावंजे, ता.पनवेल, जि.रायगड ४१०२०८ ........................................................ **वादी**

**विरुध्द**

१. श्री. दिपक नारायण गोखले, २. श्री. प्रसारद नारायण गोखले
क्र. १ व २ रा. ३८, न्युप्रियदर्शन, भारती ज्योती बस स्टॉपजवळ, बिबवेवाडी, मार्केटयार्ड, पुणे ४११०३७
३. श्रीमती. मानसी मनोहर गाडगीळ
रा. १८, यमुना बंगला, तहून हॉस्पीटल जवळ, मनिक नगर, गंगापूर रोड, नाशिक ४२२०१३
४. श्री. शैलेंद्र श्रीधर गोखले, रा. काश्यम, ६११, टिळक रोड, ता. पनवेल, जि. रायगड ४१०२०६
५. श्री. मुकुंद सिताराम गोखले
रा. बी–१६, विश्वास सीएचएस, मंगला स्कुलजवळ, कोपरी (पूर्व), तालुका व जिल्हा ठाणे ४००६०३
६. सलमान याकूब शेख, ७. सोयल याकूब शेख, ८. रुमाना याकुब शेख
९. बानु इम्तीयाज शेख, १०. रुकसार आवेश शेख, सर्व रा. मुक्काम, पो. वावंजे, ता. पनवेल, जि.रायगड ४१०२०८
११. बिल्कीश करीम शेख, रा. मु. पो. टिटवाळा, ता. कल्याण, जि. ठाणे ४२१६०५
१२. दाऊद अब्दुल गफूर शेख, रा. मुक्काम पोस्ट वावंजे, ता. पनवेल, जि.रायगड
१३. भगवान शंकर पाडेकर, रा. पाडेकर आळी, चिंद्रण, ता. पनवेल, जि. रायगड ४१०२०८ ....................................... **प्रतिवादी**

तमाम जनतेस तसेच सामनेवाले यांना या नोटीशीव्दारे कळविण्यांत येते की, महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम १९६६ चे कलम २४७ नुसार मौजे – महोदर, ता. पनवेल, जि. रायगड येथिल फेरफार नोंद क्र. १४२६, २४०३ व २४२८ चे विरुध्द अर्जदार यांनी या न्यायालयात प्रस्तूतचे अपिल दाखल केलेले आहे. सदर अपिलामध्ये वेळोवेळी सुनावणी घेण्यांत आलेल्या आहेत प्रस्तूत अपिलाच्या सुनावणीकामी सामनेवाले या न्यायालयात सुनावणीकामी हजर झालेले नाहीत. सदर अपिलाची पुढील सुनावणी ही दिनांक **३०/०७/२०२६** रोजी सकाळी ११.०० वाजता निश्चित करण्यांत आली आहे.

सबब या जाहीर नोटीशीव्दारे सामनेवाले यांनी तसेच वरील जमिन मिळकतीशी संबधित असलेल्या व्यक्तीनी २१ दिवसांच्या आत उपविभागीय अधिकारी कार्यालय पनवेल, जि. रायगड येथे समक्ष येऊन आवश्यकत्या सबळ कागदोपत्री पुराव्यासह लेखी म्हणणे दाखल करावे. सदर विहीत केलेल्या मुदतीनंतर कोणचीही व कोणत्याही प्रकारची हरकत आल्यास त्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही.

**जमिन मिळकतीचे वर्णन**
**मौजे – महोदर, ता. पनवेल, जि.रायगड**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे. आर. | आकार रु. पैसे |
|---|---|---|---|
| १६४ | २०९/१ | २.८०.०० | ५.९४ |

सदरची जाहीर नोटीस आज रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिली.
ठिकाण :– पनवेल.
दिनांक :– १६/०७/२०२६

(कोर्टाचा शिक्का)

**सही/–**
**उप विभागीय अधिकारी पनवेल**
उपविभाग पनवेल



**जाहीर नोटीस**

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील प्रमाणे वर्णन केलेली मिळकत जमीन मालक **श्री. चिंतामणी बळीराम गांगरे,** रा. कुंडेवहाळ, ता. पनवेल, जि. रायगड यांजकडून सदर मिळकत विकत घेण्याच्या विचारात आहेत.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे पाटनोली, ता. पनवेल, जि. रायगड**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| २ | २ | ०–१९–०१ | २.१२ |

तरी सदरहू मिळकतीवर वा कोणत्याही भागावर गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, वचनचिठ्ठी, खरेदीखत, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, पोटगी, साठेकरार, वा तत्सम कोणतेही दावे मालकी वा अन्य हक्क हितसंबंध असलेल्या व्यक्तींनी वा संबधीतांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून २१ दिवसांच्या आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरूप विषद करून प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्त्यावर लेखी कळवावे. जर वरील मुदतीत कोणाकडूनही काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही किंवा असल्यास सदर हरकती, तक्रारी रद्दबातल आहेत किंवा त्या सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरून आमचे अशील सदर व्यवहार पूर्ण करतील, याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी. व सदर मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

पनवेल,
दिनांकः २४/०७/२०२६

**सही /–**
**ॲड. पी. जी. खोपकर**
**ॲडव्होकेट**

पत्ता :– शॉप नं १३०, मुन्सीपल शॉपींग कॉम्प्लेक्स, पहिला मजला, भाजी मार्केटजवळ, पनवेल ता. पनवेल, जि. रायगड. ४१०२०६. मो.नं. ९८१९१४४९९१



**PUBLIC NOTICE**

Notice is hereby given to the public at large that my clients are intending to purchase from Mr. K.V Madhusudan who is currently residing at Mumbai, anAgricultural land admeasuring 7.53.80 hectares situated at Gat No 31/1, Village Vajapur, Taluka Panvel, Jhilla Raigad, within the jurisdiction of Group Gram Panchayat Vajapur, Taluka Panchayat Vadgaon Panvel, Zilla Parishad Raigad (hereinafter referred to as the "said Property"), together with all rights, easements, common areas, and facilities appurtenant thereto, free from all encumbrances of whatsoever nature.

Any person(s), institution(s), bank(s), financial institution(s), company(ies) whether incorporated or not,, Hindu Undivided Family, association of persons, body corporate, lender(s), creditor(s), or any other entity having any claim, objection, demand, right, title, interest or benefit of whatsoever nature in respect of the said Property by way of sale, mortgage, charge, lien, lease, sub-lease, tenancy, sub-tenancy, gift, exchange, inheritance, succession, partition, trust, maintenance, easement or otherwise, are hereby required to make the same known in writing along with documentary evidence to the undersigned at the address mentioned below within 14 days from the date of publication of this notice, failing which such claim, if any, shall be deemed to have been waived and/or abandoned and the proposed transaction shall be completed without reference to such claim.

Date: 21st July, 2026
Advocate for the Purchaser

Sd/-
Adv. Vithal Mahajan

A-Wing, 101, Sai Krupa Premises, Sector 12,
Plot No. D-68, Kharghar, Navi Mumbai – 410210



रजिस्ट्री सं. डी.एल.- 33004/99 | REGD. No. D. L.-33004/99

**भारत का राजपत्र**
**The Gazette of India**

सत्यमेव जयते

सी. जी. – डी. एल. –अ. 27022026-270550
CG-DL-E-27022026-270550

असाधारण
* EXTRAORDINARY
भाग II–खण्ड 3 उप – खण्ड (ii)
PART II–Section 3–Sub-section (ii)
प्राधिकार से प्रकाशित
PUBLISHED BY AUTHORITY

सं. 1006] नई दिल्ली, शुक्रवार, फरवरी 27, 2026/फाल्गुन 8, 1947
No. 1006] NEW DELHI, FRIDAY, FEBRUARY 27, 2026 / PHALGUNA 8, 1947

सड़क परिवहन और राजमार्ग मंत्रालय
अधिसूचना
नई दिल्ली, 27 फरवरी, 2026

का.आ. 1050 (अ).केन्द्रीय सरकार, राष्ट्रीय राजमार्ग अधिनियम, १९५६ (१९५६ का ४८) (जिसे इसमें इसके पश्चात् उक्त अधिनियम कहा गया है) की धारा ३क की उप–धारा (१) द्वारा प्रदत्त शक्तियों का प्रयोग करते हुए, यह समाधान हो जाने के पश्चात् कि महाराष्ट्र राज्य के रायगड जिले में शाहपूर–मुरबाड (NH–२२२) – म्हसा– कर्जत– खोपोली NH–४ (खंड ३ पाटगाव–खोपोली) राष्ट्रीय राजमार्ग ५४८ए के कि.मी. ४३/७८३ से कि.मी. ६९/५०३ तक के भूखंड का निर्माण (दो/चार लेन,आदि) अनुरक्षण, प्रबन्धन और प्रचालन के लोक प्रयोजन के लिए वह भूमि अपेक्षित है जिसका संक्षिप्त वर्णन नीचे अनुसूची में दिया गया है, ऐसी भूमि का अर्जन करने के अपने आशय की घोषणा करती है।

कोई भी व्यक्ति, जो भूमि में हितबद्ध है, उक्त अधिनियम की धारा ३ग की उपधारा (१) के अधीन पूर्वोक्त प्रयोजन के लिए ऐसी भूमि के उपयोग पर राजपत्र में इस अधिसूचना के प्रकाशन की तारीख से इक्कीस दिन के भीतर अपनी आपत्ति प्रकट कर सकेगा ।

ऐसी प्रत्येक आक्षेप सक्षम प्राधिकारी, तथा उपविभागीय अधिकारी कर्जत, विभाग कर्जत को लिखित रूप मे किया जायगा और उसमें उसके आधार अधिकथित किए जाएंगे और सक्षम प्राधिकारी, आपत्तिकर्ता को व्यक्तिगत रूप मे या किसी विधि व्यवसायी द्वारा सुने जाने का अवसर देगा और ऐसी आक्षेपो की सुनवाई के पश्चात् तथा ऐसी और जाँच करने के पश्चात, यदि कोई हो, जिसे सक्षम प्राधिकारी आवश्यक समझे, आदेश द्वारा या तो आपत्तियों को अनुज्ञात कर सकेगा या अननुज्ञात कर सकेगा।

उक्त अधिनियम की धारा ३ग की उप–धारा (२) के अधीन सक्षम प्राधिकारी द्वारा किया गया कोई भी आदेश अंतिम होगा ।

इस अधिसूचना के अंतर्गत आने वाली भूमि के रेखांक और अन्य ब्यौरे सक्षम प्राधिकारी के उक्त कार्यालय में उपलब्ध हैं और उनका हितबद्ध व्यक्तियों द्वारा निरीक्षण किया जा सकता है।

**अनुसूची**

**महाराष्ट्र राज्य के रायगड जिले में शाहपूर–मुरबाड (NH–२२२)–म्हसा–कर्जत–खोपोली NH–४ ( खंड ३ पाटगाव–खोपोली) राष्ट्रीय राजमार्ग ५४८ए के कि.मी.४३/७८३ से कि.मी.६९/५०३ के लिए अर्जन की जाने वाली संरचना रहित अथवा संरचना सहित भूमि का संक्षिप्त विवरण।.**

| राज्य का नाम : महाराष्ट्र | | | जिले का नामः रायगड | | |
|---|---|---|---|---|---|
| क्रमिक संख्या | सर्वेक्षण संख्या | भूमि का प्रकार | भूमि की प्रकृति | भूमि का क्षेत्रफल (स्थानीय इकाई) | भूमि का क्षेत्रफल (हेक्टेयर) |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| तालुक का नाम : कर्जत | | | | | |
| गांव का नाम : सुगवे | | | | | |
| 1 | 22/1 | निजी | कृषि | 0.596 (हेक्टेयर) | 0.596 |
| | | | | Total | 0.596 |

[फा. सं. RW/NH–१२०१४/११८/२०१७/MAH/३A]

Sd/–
शेख अमीनखान, निदेशक

जिमाका/रायगड/जाहिरात/83/2026

# विठ्ठल नामाची शाळा भरली..

## कामोठे विद्यालयात पांडुरंगांचा जयघोष




**कामोठे : रामप्रहर वृत्त**

लोकनेते रामशेठ ठाकूर इंग्लिश मीडियम स्कूल आणि ज्युनिअर कॉलेज कामोठे या विद्यालयाचे प्रांगण विठ्ठलाच्या गजरामध्ये अक्षरशः दुमदुमून गेले. औचित्य होते आषाढी एकादशीचे.

याचे औचित्य साधून विद्यालयात विविध कार्यक्रम सादर केले गेले. यावेळी आषाढी एकादशीचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावे यासाठी विशेष असे किर्तन आयोजित केले गेले. त्याचबरोबर आषाढी एकादशीचा आध्यात्मिक, पौराणिक आणि वैज्ञानिक संदर्भदेखील विद्यार्थ्यांना विषद करण्यात आला.

विद्यार्थ्यांनी एकाग्रतेचा ज्ञानाचा मंत्र जपावा असे प्रतिपादन विद्यालयाच्या प्राचार्या स्वप्नाली म्हात्रे यांनी आपल्या भाषणांमधून व्यक्त केला. यावेळी विद्यार्थ्यांनी वारीमध्ये सादर होणारे रिंगण,फुगड्या आणि टाळाच्या गजरामध्ये विठ्ठल भक्तीचा जयघोष केला.एक अनोखा असा प्रसंग विद्यार्थ्यांनी आपल्या क्रियाकलापातून सादर केला. याचबरोबर विद्यार्थी विद्यार्थिनींनी पारंपारिक पोशाख परिधान केल्यामुळे एक वेगळीच झळाळी या कार्यक्रमाला प्राप्त झाली. नऊवारी साडी तसेच वारकरी पोशाख यामध्ये विद्यार्थी विद्यार्थिनी अतिशय उत्साहाने सहभागी झाल्या होत्या. तसेच विठ्ठल आणि रुक्मिणी यांचे पोशाखही विद्यार्थी विद्यार्थिनींनी परिधान केले होते.

यावेळी विद्यालयाच्या पर्यवेक्षिका सारिका लांजूडकर, नेहा खन्ना तसेच कोमल गायकवाड आदी उपस्थित होत्या. शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आदीही या कार्यक्रमात उत्साहाने सहभागी झाले होते.

## सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर स्कूलमध्ये भक्तिमय वातावरणात आषाढी एकादशी उत्साहात

**उलवे : रामप्रहर वृत्त**

सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर स्कूलमध्ये आषाढी एकादशीचा सण मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला. महाराष्ट्राच्या समृद्ध वारकरी परंपरेची आणि संत संस्कृतीची ओळख विद्यार्थ्यांना व्हावी, या उद्देशाने शाळेत विविध धार्मिक व सांस्कृतिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.

यावेळी विद्यार्थ्यांनी विठ्ठल-रुक्मिणी, संत ज्ञानेश्वर महाराज, संत तुकाराम महाराज तसेच विविध वारकरी वेशभूषा साकारून कार्यक्रमाची शोभा वाढवली. विद्यार्थ्यांनी पारंपरिक वेशभूषेत टाळ-मृदंगाच्या गजरात 'ज्ञानोबा-तुकाराम'चा जयघोष करत भक्तिमय वातावरण निर्माण केले. काही विद्यार्थ्यांनी अभंग, भारूड आणि वारकरी परंपरेवर आधारित सांस्कृतिक सादरीकरण केले.



या उपक्रमातून विद्यार्थ्यांना आषाढी एकादशीचे धार्मिक, सांस्कृतिक आणि सामाजिक व वैज्ञानिक दृष्टिकोन याचे महत्त्व मराठी विभाग प्रमुख मनिषा मोरे यांनी सांगितले.संतांच्या शिकवणीतून भक्ती, समानता, बंधुभाव, प्रामाणिकपणा आणि मानवतेची मूल्ये विद्यार्थ्यांनी आत्मसात केली.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षकवृंद यांनी विशेष परिश्रम घेतले. विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग आणि आकर्षक वेशभूषेमुळे संपूर्ण शाळेचे वातावरण 'अवघा रंग एक झाला, विठ्ठल नामाचा गजर झाला' अशा भक्तिमय वातावरणाने भारून गेले.

## गव्हाण येथील विद्यालयात आषाढी एकादशीनिमित्त वृक्षदिंडी

**गव्हाण : रामप्रहर वृत्त**

येथील रयत शिक्षण संस्थेच्या श्री.छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ.भगत ज्युनिअर कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी आषाढी एकादशीनिमित्त वृक्षदिंडी व विठ्ठल रखुमाईच्या मूर्तींच्या पारंपारिक पालखी मिरवणूकीने पर्यावरण रक्षण व वृक्ष संवर्धनाचा जयघोष केला.

विद्यालयाच्या प्रांगणात विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे ज्येष्ठ सदस्य अनंताशेठ ठाकूर ,विश्वनाथ कोळी व अ‍ॅड.राहुल घरत तसेच ज्येष्ठ नेते जयवंतराव देशमुख व सुदर्शन घरत यांचे शुभ हस्ते विठ्ठल रुखुमाईच्या मूर्तींसह पानाफुलांची आकर्षक सजावट केलेल्या पारंपरिक पालखीचे पूजन करून विद्यार्थीनींनी डोईवर धारण केलेल्या तुळशी वृंदावने व इतर रोपांसह वृक्षदिंडी मार्गस्थ झाली.

विठ्ठल - रुखमिणी त्याचप्रमाणे संत मेळा आणि वारकऱ्यांच्या वेशभूषेतील विद्यार्थीनीनी डोक्यावर तुळशी व इतर रोपांच्या कुंड्या घेऊन वृक्षलागवड व वृक्षसंवर्धनाच्या घोषणांनी गव्हाण कोपर परिसर निनादून सोडला.

विठ्ठल रुक्मिणीसह महाराष्ट्राच्या वारकरी संप्रदायातील व परंपरेतील संत तुकाराम,संत नामदेव,संत चोखोबा,संत मीराबाई,संत कान्होपात्रा,संत मुक्ताई,संत जनाबाई,संत सावता माळी यांचेसह अनेक संताच्या वेशभूषेतील विद्यार्थ्यांनी कपाळी चंदनाचा टिळा,गळ्यात तुळशीच्या माळा परिधान करून टाळ मृदंगाच्या गजरात व लेझीम पथकाच्या जयघोषात वृक्षदिंडीने संपूर्ण गव्हाण पंचक्रोशीत भक्तीमय आणि पर्यावरण पोषक वातावरण निर्मिती केली.



ढोल-ताशा,टाळ-मृदंग व लेझीम पथकाच्या तालावर सर्व विद्यार्थी वृक्षदिंडीमध्ये अत्यंत उत्साहाने सहभागी झाले.सर्व शिक्षकवृंदाच्या सहभागाने वातावरणात अधिक उत्स्फूर्त जल्लोष निर्माण झाला.विविध ठिकाणी वृक्षदिंडीचे व पालखीचे ग्रामस्थांनी विशेषतः महिला वर्गाने स्वागत करून भक्तीभावाने पालखीचे पूजन केले. विद्यालयाच्या प्रांगणात रंगलेला रिंगण सोहळा,महिला शिक्षिकांची विद्यार्थीनींची लेझिम प्रात्यक्षिके आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरला तर पालखी मिरवणूक मार्गावर विद्यार्थ्यी,शिक्षक तसेच महिला शिक्षिकांनी फेर धरून पारंपारिक फुगडी खेळत केलेला रिंगण सोहळाही लक्षवेधी ठरला. वृक्षदिंडीची सांगता विद्यालयाच्या प्रांगणात विठ्ठल रुक्खमाई च्या आरती आणि भजनांनी झाली. ग्रंथपाल महेश म्हात्रे यांच्या सुरेल वारकरी आरती गायनाने व उपशिक्षिका संपदा म्हात्रे, हर्षला पाटील व विद्यार्थ्यांच्या गायनाने भक्तीमय वातावरण निर्मिती झाली.

याप्रसंगी विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे ज्येष्ठ सदस्य अनंताशेठ ठाकूर,विश्वनाथ कोळी व अ‍ॅड.राहुल घरत, उपमुख्याध्यापक विलासराव लेंभे,पर्यवेक्षिका शशिकला पाटील,रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य रविंद्र भोईर, लाईफ वर्कर देवेंद्र म्हात्रे, ज्युनिअर कॉलेज विभाग प्रमुख संजय उगले, गुरुकुल प्रमुख संदीप भोईर,विद्यालयाचे ज्येष्ठ शिक्षक सागर रंधवे,वरिष्ठ लेखनिक निलेश गोडे,ग्रंथपाल महेश म्हात्रे,प्रमोद करावकर,शितलकुमार म्हात्रे,विशांत ठाकूर,गणेश भोईर,सुरेश पारखे,प्रशांत परदेशी,चारुशीला ठाकूर,गीतांजली म्हात्रे,सारिका ठाकूर,उज्वला म्हात्रे,वृषाली म्हात्रे,प्रतिज्ञा घरत,दर्शना माळी,संपदा म्हात्रे,माधुरी म्हात्रे,विद्या पाटील, सारिका ठाकूर,शितल ठाकूर,संगणक शिक्षिका ज्योत्स्ना कोळी,सोनाली घरत व दर्शना भोईर तसेच राजेंद्र चौधरी,अर्चना पाटील,करुणा तांडेल,जयराम सोनटक्के, विठ्ठलसिंग पाटील आदी उच्च माध्यमिक शिक्षक,दोन्ही शाखांचे सर्व शिक्षक, विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. विद्यालयाचे क्रीडा शिक्षक सुरेश पारखे यांनी लेझिम पथकाचे तर ज्येष्ठ उच्च माध्यमिक शिक्षक राजेंद्र चौधरी व अर्चना पाटील यांनी झांज पथकाचे नेतृत्व केले. विद्यालयाच्या सांस्कृतिक विभाग प्रमुख हर्षला पाटील यांनी नियोजनबद्धपणे वृक्षदिंडीचे नेटके आणि आकर्षक आयोजन केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सागर रंधवे व हर्षला पाटील यांनी केले.

## प्रकल्पग्रस्तांना आलेल्या नोटीसींबाबत मिळणार दिलासा

### आमदार मंदा म्हात्रेंची मुख्यमंत्र्यांसोबत बैठक

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील स्थानिक प्रकल्पग्रस्त (भूमिपुत्र) नागरिकांच्या घरांना व इमारतींना महापालिका प्रशासनाकडून बजावण्यात आलेल्या सुनावणीच्या नोटिसांमुळे नागरिकांमध्ये तीव्र असंतोष, संभ्रम आणि भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. या गंभीर व ज्वलंत प्रश्नाकडे राज्य शासनाचे लक्ष वेधण्यासाठी बेलापूर विधानसभा मतदारसंघाच्या आमदार मंदा म्हात्रे यांनी मुंबई येथे पावसाळी अधिवेशनात लक्षवेधी सूचना मांडून या नोटिसांना तात्काळ स्थगिती देण्याची मागणी केली होती परंतु समाधानकारक उत्तर न मिळाल्याने आमदार मंदा म्हात्रे यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. नवी मुंबई प्रकल्पग्रस्तांना दिलेल्या सुनावणी नोटिसांना स्थगिती देणेबाबत शासन स्तरावर योग्य तो मार्ग काढण्यासाठी मुख्यमंत्री दालनात बैठक घेऊन सदर प्रश्न मार्गी लावावे असे पत्राद्वारे कळविले.



आमदार मंदा म्हात्रे यांनी या विषयाचे गांभीर्य मुख्यमंत्र्यांना सांगितले की, नवी मुंबईतील सर्व गावठाण भागांमध्ये महानगर पालिकेतर्फे या सुनावणीच्या नोटिसा दिल्या जात आहेत, तेथील अनेक घरे ही आजची नसून तब्बल ७० ते ८० वर्षांपूर्वीची जुनी व पारंपरिक आहेत. विशेष म्हणजे, शासनाने यापूर्वीच या घरांना अधिकृत मालमत्तापत्रके देखील बहाल केली असून असे असतानाही, ज्या भूमिपुत्रांनी त्याग करून नवी मुंबई शहराच्या निर्मितीसाठी आपल्या हक्काच्या जमिनी दिल्या, आज त्यांनाच प्रशासकीय चक्रव्यूहात अडकवून मानसिक त्रास दिला जात आहे. या अत्यंत संवेदनशील आणि जिव्हाळ्याच्या विषयावर राज्य सरकारने तात्काळ मार्ग करावा, अशी मागणी आमदार म्हात्रे यांनी केली.

तसेच, जोपर्यंत शासन स्तरावर या संपूर्ण प्रकरणावर सविस्तर चर्चा होऊन एखादा ठोस व कायमस्वरूपी सकारात्मक मार्ग निघत नाही, तोपर्यंत महानगरपालिकेने सुरू केलेली ही सुनावणीची प्रक्रिया संपूर्णपणे थांबवून तात्काळ स्थगिती देण्यात यावी असेही त्यांनी सांगितले. त्यामुळे या सर्व विषयांसंदर्भात राज्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांच्या मंत्रालयीन दालनात लवकरच बैठक होणार असून सदरचे प्रश्न मार्गी लागणार आहेत.

तसेच भूमिपुत्रांच्या हक्कासाठी आणि त्यांच्या हक्काच्या छतासाठी आमदार मंदा म्हात्रे या सुरुवातीपासूनच खंबीरपणे लढत आल्या असून, याही प्रकरणात त्या शेवटपर्यंत प्रकल्पग्रस्तांना न्याय मिळवून देतील,

## स्वरा मुरकरची राष्ट्रीय स्तरावर छाप

**नवी मुंबई : बातमीदार**

मुंबईतील गोरेगाव येथील आदर्श विद्यालय इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये इयत्ता सातवीत शिक्षण घेणाऱ्या स्वरा मुरकर हिने राष्ट्रीय हस्ताक्षर प्रावीण्य स्पर्धा (रायटिंग विझाड्सॅ) २०२५-२६ मध्ये देशभरातील हजारो विद्यार्थ्यांमधून उत्कृष्ट कामगिरी करत राष्ट्रीय स्तरावर २४ वा तर राज्यात १० वा क्रमांक पटकावला. स्वराचे मूळ गाव रायगड जिल्ह्यातील माणगाव तालुक्यातील माकटी असून, तिच्या या उल्लेखनीय यशामुळे मुंबईसह माकटी गाव आणि रायगड जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. तिच्यावर सर्व स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



स्वराच्या सुंदर, स्वच्छ, आकर्षक आणि शिस्तबद्ध हस्ताक्षरामुळे तिने परीक्षकांची मने जिंकली. तिच्या या यशामागे सातत्यपूर्ण मेहनत, चिकाटी आणि अभ्यासाप्रती असलेली निष्ठा हे महत्त्वाचे घटक आहेत. तिच्या या यशाबद्दल विविध स्तरांतून कौतुक होत आहे.

## नमुंमपा सरळसेवा पदभरती परीक्षा प्रक्रिया दोन्ही दिवशी सुव्यवस्थितरित्या पूर्ण

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महानगरपालिका सरळसेवा भरती २०२५ - २०२६' प्रक्रियेंतर्गत २१ जुलै रोजी ३ सत्रांमध्ये व आज २२ जुलै रोजी २ सत्रांमध्ये ३ संवर्गातील १३ पदांसाठी ऑनलाईन स्पर्धा परीक्षा सुयोग्य नियोजनामुळे अत्यंत सुव्यवस्थितरित्या संपन्न झाल्या. आज परीक्षेच्या दुस-या व अखेरच्या दिवशी पवई, मुंबई येथील केंद्रांवर सुरळीतपणे परीक्षा पार पडली. कालही ६ जिल्ह्यातील १३ केंद्रांवर नियोजनबध्द रितीने परीक्षा प्रक्रिया संपन्न झाली होती.

टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिस यांच्या माध्यमातून घेण्यात आलेल्या एकूण ६ संवर्गातील ३६ पदांकरिता १८,९३० अर्ज ऑनलाईन प्राप्त झाले होते. त्या अनुषंगाने ऑनलाईन स्पर्धा परीक्षा केंद्रांवर महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली महानगरपालिकेतील वर्ग १ श्रेणीचे ८ समन्वय अधिकारी तसेच १३ केंद्र निरीक्षक अधिकारी दक्षतेने कार्यरत होते. या अधिकाऱ्यांनी परीक्षेच्या आदल्या दिवशी, २० जुलै रोजीच नेमून दिलेल्या जिल्हयांमध्ये जाऊन परीक्षा केंद्रांवरील संपूर्ण व्यवस्थेची बारकाईने पाहणी केली. त्यासोबतच कायदा आणि सुव्यवस्थेच्या दृष्टीने आवश्यक पोलीस बंदोबस्त तैनात ठेवण्यात आला होता. ऑनलाईन परीक्षा असल्याने खबरदारी घेत सुरक्षा विभाग, केंद्र सरकार यांच्या मान्यतेने सर्व परीक्षा केंद्रातील परीक्षा कक्षांमध्ये मोबाईल जॅमर बसविण्यात आले होते.



कालच्याप्रमाणेच आजही सकाळी ठीक ९.०० वाजता पवई, मुंबई येथील परीक्षा केंद्रांवर परीक्षेस नियोजन केल्याप्रमाणे वेळेवर सुरुवात झाली. आजच्या दोन्ही सत्रांमधील परीक्षा प्रक्रीया व्यवस्थित पार पडली.

सकाळी ९ ते ११ वा. या पहिल्या सत्रात ५८८ उमेदवारांनी परीक्षा दिली.दुपारी १ ते ३ वा. या दुसऱ्या सत्रात ४२२ उमेदवारांनी परीक्षा दिली.अशाप्रकारे नमुंमपा सरळसेवा भरती प्रक्रियेतील दुस-या दिवशी १०१० उमेदवारांनी परीक्षा दिली आहे.

नवी मुंबई महानगरपालिकेची भरती प्रक्रिया अत्यंत पारदर्शक पध्दतीने नियमानुसार काटेकोरपणे होत असून उमेदवारांनी नोकरी मिळवून देण्यासाठी कोणीही व्यक्ती कोणत्याही प्रकारची मागणी करीत असल्यास दक्ष रहावे व स्थानिक पोलीसांकडे तक्रार करावी असे आवाहन नमुंमपा आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी केले आहे.

## उरण पोलिसांचा विद्यार्थी सुरक्षा अवेअरनेस उपक्रम

**उरण : प्रतिनिधी**

उरण तालुक्यातील शाळा, महाविद्यालयातील विद्यार्थ्यां मध्ये कायदा, सायबर सुरक्षा आणि व्यसनमुक्ती याबत जागरूकता निर्माण व्हावी यासाठी उरण पोलीस ठाण्याच्या वतीने "विद्यार्थी सुरक्षा अवेअरनेस उपक्रम राबविण्यात आला. उरण पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक जगदीश शेलकर यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलिस निरिक्षक राजेश खांदवे, बीट मार्शल व गोपनीय शाखेच्या अमलदारांनी उरण परिसरातील चार शैक्षणिक संस्थांना भेट देऊन विद्यार्थ्यांशी थेट संवाद साधला.



या मोहिमेअंतर्गत प्रथम कोकण ज्ञानपीठ महाविद्यालय, उरण येथे भेट देण्यात आली. येथे ३० विद्यार्थी व ०३ शिक्षकांच्या उपस्थितीत महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना गुन्हेगारी, सायबर फसवणूक आणि वाहतूक नियमांबाबत सविस्तर माहिती देण्यात आली. त्यानंतर जेएनपीए टाऊनशिप येथील भागुबाई चांगू ठाकूर शाळेत २२३ विद्यार्थी व ०५ शिक्षकांना "गुड टच-बॅड टच", मोबाईलचा योग्य वापर आणि मित्रांसोबत वागताना घ्यावयाची काळजी याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.ग्रामीण भागातील रायगड जिल्हा परिषद शाळा, बोकडविरा येथे २४ विद्यार्थी व शिक्षकांना व्यसनाधीनतेचे दुष्परिणाम, अनोळखी व्यक्तींपासून सावध कसे राहावे आणि पोलिसांच्या हेल्पलाइन क्रमांकांची माहिती देण्यात आली. तर जेएनपीए टाऊनशिप, राजर्षी शाहू महाराज शाळा, नवघर येथे ९६ विद्यार्थी व ०६ शिक्षकांसमोर सोशल मीडियाचा योग्य वापर, अफवांपासून सावध राहणे आणि पोलिसांशी मैत्रीपूर्ण संबंध कसे ठेवावेत यावर चर्चा करण्यात आली.यावेळी सपोनि. राजेश खांदवे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की पोलिस हे केवळ कारवाईसाठी नसून ते विद्यार्थ्यांचे मित्र आहेत. कोणतीही अडचण आल्यास तातडीने ११२ किंवा सायबर हेल्पलाइन १९३० वर संपर्क साधावा. तसेच मोबाईलचा वापर शिक्षणासाठीच करावा आणि वेळेचा अपव्यय टाळावा असे आवाहन त्यांनी केले.

बीट मार्शल आणि गोपनीय शाखेच्या अमलदारांनी प्रत्यक्ष उदाहरणे देऊन विद्यार्थ्यांना विविध गुन्ह्यांपासून दूर कसे राहावे याचे प्रात्यक्षिकही दाखवले.एकूण या चारही शाळेतील ३७३ विद्यार्थी व १६ शिक्षक या अवेअरनेस उपक्रमात सहभागी झाले होते. शाळा व महाविद्यालयांच्या मुख्याध्यापकांनी उरण पोलिसांच्या या उपक्रमाचे कौतुक केले असून यापुढेही असे उपक्रम राबविण्याची अपेक्षा व्यक्त केली.

## वाशीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त जनसंवाद व विकास उपक्रम



**नवी मुंबई : बातमीदार**

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त भारतीय जनता पार्टी, नवी मुंबईतर्फे वाशी येथील कर्नाटक भवनमध्ये विविध सामाजिक व जनहिताच्या उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला नवी मुंबईचे उपमहापौर दशरथ भगत आणि नगरसेवक निशांत भगत यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी परिसरातील ज्येष्ठ नागरिकांना छत्री वाटप करण्यात आले. तसेच नागरिकांशी थेट संवाद साधत प्रभागातील विविध विकासकामे, उपलब्ध नागरी सुविधा आणि आगामी नियोजनाबाबत सविस्तर माहिती देण्यात आली.

कार्यक्रमात बोलताना उपमहापौर दशरथ भगत म्हणाले की, "नागरिकांच्या नागरी समस्या सोडविण्यासाठी आम्ही सर्वोतोपरी प्रयत्नशील आहोत. लोकांच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी सातत्याने पाठपुरावा करून प्रत्येक प्रश्न मार्गी लावण्याचा आमचा प्रयत्न राहील.नगरसेवक निशांत भगत यांनी सांगितले की, "लोकप्रतिनिधी आणि शासकीय यंत्रणेचा प्रभावी वापर करून नागरिकांनी आपल्या समस्या मांडाव्यात. संवादातून आणि समन्वयातून प्रत्येक प्रश्नावर योग्य तो मार्ग काढणे शक्य होते. म्हणूनच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त केवळ औपचारिक कार्यक्रम न घेता नागरिकांशी प्रत्यक्ष संवाद साधण्याचा निर्णय आम्ही घेतला असे निशांत भगत यांनी सांगितले.

यावेळी प्रभागातील विकास आराखड्याबाबतही माहिती देण्यात आली. मैदाने जतन करणे, अधिकाधिक जॉगिंग ट्रॅक विकसित करणे, नियोजनबद्ध पद्धतीने दर्जेदार रस्त्यांची उभारणी करणे, वीजपुरवठ्यासंदर्भातील नागरिकांच्या तक्रारींना प्राधान्याने सोडविणे, तसेच परिसरातील मूलभूत सुविधांमध्ये सातत्याने सुधारणा करण्यासाठी करण्यात येणाऱ्या प्रयत्नांची माहिती नागरिकांना देण्यात आली.

# करोडी भुयारी मार्गासमोर गॅस टँकर कलंडला

## गळती न झाल्याने मोठा अनर्थ टळला

**पोलादपूर : प्रतिनिधी**

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६६ वरील कशेडी घाटाला पर्यायी भुयारी मार्गासमोर गुरुवारी सायंकाळी अमोनिया गॅस वाहून नेणारा टँकर हा चालकाचा ताबा सुटल्याने कलंडला. या अपघातात टँकरमधून कोणतीही गॅसगळती न झाल्याने मोठा अनर्थ टळला. अपघातात टँकर चालकाला किरकोळ दुखापत झाली आहे.



अलिबाग येथून लोटे एमआयडीसीतील प्रेरणा केमिकल्स कंपनीकडे अमोनिया गॅस घेऊन जाणारा टँकर मुंबईकडून गोव्याच्या मार्गिकेवरून जात होता. कशेडी घाटाला पर्यायी भुयारी मार्गासमोर आल्यानंतर चालकाचे टँकरवरील नियंत्रण सुटल्याने टँकर रस्त्यावर पलटी झाला. धोकादायक अमोनिया गॅस टँकरमध्ये असल्याने काही काळ भितीचे वातावरण निर्माण झाले होते, मात्र टँकरच्या तपासणीअंती गॅसगळती झालेली नसल्याचे स्पष्ट झाल्याने सर्वांनी सुटकेचा निःश्वास टाकला. प्रशासनाने तात्काळ घटनास्थळी धाव घेत परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी सुरक्षेच्या दृष्टीने परिसराची पाहणी केली तसेच वाहतुकीचे नियोजन केले.

या अपघातात टँकरचालक प्रेमप्रकाश भस्कळ पटेल (वय ४२, रा. कमळानगर, जास्मिन रोड, बृहन्मुंबई) याला किरकोळ दुखापत झाली. त्याला तातडीने कळंबणी उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले.

लोटे एमआयडीसीतील प्रेरणा केमिकल्स कंपनीकडे जात असल्याने कंपनीचे सेफ्टी अधिकारी व प्रतिनिधीही घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी टँकरची सखोल तपासणी करून कोणत्याही प्रकारची अमोनिया गॅसगळती झालेली नसल्याचे स्पष्ट केले. यावेळी नागरिकांना किंवा परिसराला कोणताही धोका नसल्याचे त्यांनी सांगितले.

रात्री उशिरा अपघातग्रस्त टँकर सुरक्षितपणे रस्त्याच्या बाजूला करण्यात आला आणि मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरील वाहतूक पूर्ववत सुरळीत करण्यात आली. या अपघाताबाबत पुढील तपास सुरू आहे.

# महिलेच्या हत्येप्रकरणी आरोपीला दहा वर्षांची शिक्षा

**अलिबाग : प्रतिनिधी**

महिलेच्या चारित्र्यावर संशय घेऊन तिची हत्या करणाऱ्या आरोपीला माणगाव सत्र न्यायालयाने १० वर्षांची सक्तमजुरीची शिक्षा सुनावली आणि दंडही ठोठावला. राम नथू जाधव असे शिक्षा सुनावण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे.

हत्येची घटना ९ मार्च २०२१ रोजी रोहा तालुक्यातील वराठी आदिवासीवाडीवर घडली होती. मयत कुसुम वाघमारे ही महिला आणि राम जाधव पाच वर्षांपासून एकत्र राहत होते. मोलमजुरी करून दोघेही चरितार्थ चालवत होते. राम जाधव हा महिलेच्या चारित्र्यावर संशय घेत होता. यावरून त्यांच्यात वादविवाद होत होते. याच कारणावरून त्याने महिलेला बांबूच्या काठीने आणि कोयत्याने मारहाण केली, ज्यात तिचा मृत्यू झाला. दरम्यान, दोघांचे भांडण सोडविण्यासाठी शेजारी राहणारी महिला तिथे गेली. त्यावेळी आरोपी जाधव याने त्या महिलेलादेखील बांबूने मारहाण केली. यात ती जखमी झाली होती.

### माणगाव सत्र न्यायालयाचा आदेश

या प्रकरणी रोहा पोलीस ठाण्यात हत्येचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. तत्कालीन उपविभागीय पोलीस अधिकारी किरणकुमार सूर्यवंशी या गुन्ह्याचा तपास करत होते. परिस्थितीजन्य पुरावे, शवविच्छेदन अहवाल आणि तांत्रिक तपास करून सूर्यवंशी यांनी आरोपी राम जाधव याच्याविरोधात माणगाव सत्र न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. या खटल्याची सुनावणी अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायाधीश एम.के. पाटील यांच्यासमोर झाली. या प्रकरणात सरकारी वकील म्हणून योगेश तेंडुलकर यांनी युक्तीवाद केला. सुनावणीदरम्यान तपासिक अधिकारी, वैद्यकीय अधिकारी आणि राम जाधव यांच्या मारहाणीत जखमी झालेली महिला यांच्या साक्षी महत्त्वपूर्ण ठरल्या. आरोपीला दहा वर्ष सक्तमजुरी आणि एक हजार रुपयांचा दंडही ठोठावला. दंड न भरल्यास एक महिनाचा अतिरिक्त साध्या कारावासाची शिक्षा सुनावली आहे.

# मध्य रेल्वेला मालवाहतुकीतून २१०० कोटींहून अधिक उत्पन्न

**रोहा : प्रतिनिधी**

मध्य रेल्वेने एप्रिल ते जून २०२६ या कालावधीत ८०४८ रेक्सद्वारे २१.२१ दशलक्ष टन इतकी उल्लेखनीय मालवाहतूक नोंदवली. गेल्या वर्षीच्या याच कालावधीत ७६०८ रेक्सद्वारे २०.४० दशलक्ष टन मालवाहतूक झाली होती; त्या तुलनेत टनभारामध्ये जवळपास ४% वाढ झाली आहे.

गेल्या वर्षीच्या तुलनेत एप्रिल-जून २०२६ मध्ये रेक्सच्या संख्येतही ४४० रेक्सची वाढ झाली आहे. एप्रिल ते जून २०२६ या कालावधीत मालवाहतुकीतून मिळालेले एकूण उत्पन्न २१४३.८४ कोटी रुपये इतके होते. एप्रिल ते जून २०२६ या कालावधीत एकूण २१.२१ दशलक्ष टन मालवाहतुकीपैकी नागपूर विभागाने १२.४७ दशलक्ष टन (५९%) मालवाहतूक केली आहे, त्यानंतर मुंबई विभागाने ५.१८ दशलक्ष टन (जवळपास २४%) मालवाहतूक केली आहे. इतर विभागांच्या योगदानामध्ये सोलापूर विभागाचा १.८५ दशलक्ष टन (९%), भुसावळ विभागाचा १.२७ दशलक्ष टन (६%) आणि पुणे विभागाचा ०.४५ दशलक्ष टन (२%) मालवाहतुकीचा समावेश आहे.

मिळालेल्या एकूण २१४३.८४ कोटी रुपयांच्या उत्पन्नापैकी नागपूर विभागाने सर्वाधिक योगदान दिले असून त्यांचे उत्पन्न १२८२.७३ कोटी रुपये (जवळपास ६०%) आहे. त्यानंतर मुंबई विभागाचे उत्पन्न ४९१.३४ कोटी रुपये (२३%) इतके आहे. इतर विभागांच्या उत्पन्न मध्ये भुसावळ विभाग १४८.५० कोटी रुपये (७%), सोलापूर विभाग १२८.८९ कोटी रुपये (६%) आणि पुणे विभाग ९२.३९ कोटी रुपये (४%) इतका आहे. जून २०२६ मध्ये मालवाहतुकीचे प्रमाण २,६५९ रेक्सद्वारे ७.०२ दशलक्ष टन इतके होते. याउलट गेल्या वर्षी याच महिन्यात २,५६१ रेक्सद्वारे ६.८४ दशलक्ष टन मालवाहतूक झाली होती. यावरून मालवाहतुकीच्या प्रमाणात (टनांमध्ये) जवळपास ३% आणि रेक्सच्या संख्येत ९८ने वाढ झाल्याचे दिसून येते. जून २०२६ महिन्यात मिळालेले उत्पन्न ७०१.३३ कोटी रुपये इतके होते.

# नागोठण्यात विद्यार्थ्यांना २०० सायकलींचे वाटप

## स्व. अजित पवार यांच्या जयंतीनिमित्त उपक्रम

**नागोठणे : बातमीदार**

महाराष्ट्राचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या जयंतीनिमित्त सुनील तटकरे युवा प्रतिष्ठानच्या वतीने नागोठणे जिल्हा परिषद मतदारसंघातील गरीब व गरजू शालेय विद्यार्थ्यांना सायकलींचे वाटप करण्यात आले. नागोठणे येथील भारतीय एज्युकेशन सोसायटीच्या आयुर्वेदिक मेडिकल कॉलेजच्या सभागृहात हा कार्यक्रम पार पडला. यावेळी विद्यार्थ्यांना एकूण २०० सायकलींचे वितरण करण्यात आले.

कार्यक्रमास राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते किशोर जैन, भाई टके, शिवराम शिंदे, सदानंद गायकर, मधुकर ठमके, सरपंच सुप्रिया महाडिक, माजी सरपंच विलास चौलकर, लियाकत कडवेकर, राष्ट्रवादी नागोठणे विभागाध्यक्ष संतोष कोळी, शहराध्यक्ष बाळासाहेब टके, प्रियदर्शनी संस्थेचे अध्यक्ष शैलेश रावकर, चंद्रकांत गायकवाड, संजय भोसले, मनोहर सुटे, सचिन कळसकर, ग्रामपंचायत सदस्य अकलाख पानसरे, अ‍ॅड. प्रकाश कांबळे, शहर सचिव रोहिदास हातनोलकर, महिला आघाडीच्या जिल्हा सरचिटणीस आशा शिर्के, शहर उपाध्यक्ष प्रतिभा तेरडे, प्रगती आवाड, निष्ठा विचारे, ग्रामपंचायत सदस्य पूनम काळे, अमृता महाडिक, भाविका गिजे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते, पालक उपस्थित होते.



# माथेरानमध्ये वृक्ष उन्मळून पडले, नव्याने लागवडीची गरज

**माथेरान : बातमीदार**

माथेरान पर्यटनस्थळी जुलै महिन्यापासून पावसाने जोरदार बरसात सुरू केली आहे. मुसळधार पाऊस व सोसाट्याचा वारा यामुळे माथेरानमध्ये अनेक भागात वृक्ष उन्मळून पडण्याच्या घटना घडल्या आहेत. यामुळे काही परिसर आता ओसाड दिसत आहे.

याशिवाय माथेरानचे मुख्य प्रवेशद्वार असलेल्या दस्तुरी नाका ते बाजारपेठमधून जाणाऱ्या महात्मा गांधी रस्त्यालगत असणारी बहुतांश झाडे सुकत चालली असून अशी झाडे कधीही पडू शकतात. त्यामुळे याकडे गांभीर्याने लक्ष देऊन या अशा भागात नव्याने वृक्षारोपण करून माथेरानची वनसंपदा जोपासणे काळाची गरज असल्याचे बोलले जात आहे.

मुसळधार पाऊस आणि वाहत असलेला सोसाट्याच्या वाऱ्यामुळे मुख्य बाजारपेठेत तसेच अनेक पॉईंट भागात वृक्ष उन्मळून पडले आहेत.या वृक्ष पडण्याच्या घटनांमुळे येथे कोणतीही जीवितहानी झाली नसली तरी दुकानांचे, घरांचे मोठे नुकसान झाले आहे.

माथेरानची एकंदरीत पर्यावरणीय परिस्थिती पाहता आगामी काळात येथील पर्यटन वाढीसाठी मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण आणि त्यांचे संवर्धन ही काळाची गरज असून स्थानिकांनी व प्रामुख्याने येथील तरुणाईने याबाबत पुढाकार घेऊन माथेरान पर्यटनस्थळाची वनसंपदा वाढीस आणण्यासाठी प्रयत्न करावेत, अशी मागणी येथील जाणकार ज्येष्ठ मंडळींकडून केली जात आहे.

# मनस्वी ग्रुपतर्फे शैक्षणिक साहित्यवाटप



**कर्जत : प्रतिनिधी**

मनस्वी ग्रुप सातत्याने शैक्षणिक विभागात कार्य करीत आले आहे. या वर्षीसुद्धा ग्रुपचे संस्थापक विजय झिमुर यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून कर्जत तालुक्यातील मांडवणे येथील जिल्हा परिषद शाळेत विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटपासह शैक्षणिक मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी प्राथमिक, माध्यमिक शाळेतील भरपावसात मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

मांडवणे जिल्हा परिषद शाळेत झालेल्या कार्यक्रमास मुख्याध्यापक भुजंग दौड, अनिक जाधव, अमर सावंत, माजी जिल्हा परिषद सदस्य आशा झिमुर तसेच यावेळी दिनेश झिमुर, सोनाली झिमूर, मनस्वी झिमुर यांचासह सरपंच, उपसरपंच, शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते.

विजय झिमूर यांनी विद्यार्थांना मार्गदर्शन करताना सांगितले, आपण यशस्वी होऊन स्वतःच्या पायावर उभे राहणे महत्त्वाचे आहेच, शिवाय एक माणूस होणे फार गरजेचे आहे. तरच यशाचा खरा आनंद दुसऱ्याला देता येतो व आपल्यालासुद्धा घेता येतो.

# मुरूडमध्ये ८०० सीड बॉल्सचे रोपण

**मुरूड : प्रतिनिधी**

जय श्रीराम नागरी सहकारी पतसंस्था, राष्ट्रीय स्वयंम संघ पर्यावरण गतीविधी, मोरया ग्रुप नांदगाव यांच्या संयुक्त विद्यमाने नुकताच सुपेगाव, उसरोली, नांदगाव, नागेश्वर नगर, वाघोबा मंदिर या परिसरात ३१ युवा-युवतींनी ८०० सीड बॉल्स तसेच जांभूळ, चिंच , सीताफळ , पिंपळ अशा १५ वृक्षांची लागवड करण्यात आली.

यावेळी जय श्रीराम नागरी पतसंस्थेचे सरव्यवस्थापक संजय ठाकूर, अतिश आग्रावकर, संदेश पाटील, कुणाल गाणार, सुरेंद्र देऊळकर, सौम्य शेळके, कौस्तुभ शहापूरकर, सुजल गाणार, दुर्वेश ठाकूर आदी स्वयंसेवक उपस्थित होते. पाऊस कोसळत असताना सीड बॉल्सचे रोपण करण्यात आले.

यावेळी पर्यावरणाचे महत्व विषद करताना संजय ठाकूर म्हणाले की, वृक्ष हे पृथ्वीचे फुफ्फुसे असून ते प्राणवायू देतात, प्रदूषण कमी करतात आणि पर्यावरणाचा समतोल राखतात.



# वारी : संत परंपरेचा अमूल्य वारसा

**आमच्या विठूरायाची ख्याती**
**साता समुद्रापार आहे,**
**परदेशातील भक्तदेखील**
**विठुरायाच्या भेटीसाठी आतूर आहे**

महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आणि आध्यात्मिक परंपरेत वारीला अनन्यसाधारण महत्त्व आहे. आषाढी एकादशीच्या दिवशी विठूरायाला भेटण्यासाठी लाखो वारकरी शेकडो मैलाचं अंतर पायी चालतात. या वारीतून त्याना काय मिळत? तर भजनानंदात स्वतःचं विस्मरण होत आणि वारकरी हरिरूप होतं असंच उत्तर द्यावं लागेल. वारी ही केवळ धार्मिक यात्रा नसून भक्ती, समता, बंधूता, शिस्त आणि सामाजिक ऐक्याचा अद्वितीय सोहळा आहे.

खरंतर पंढरीच्या वाटेवर पहिलं पाऊल घराबाहेर टाकलं की प्रतिकूलतेला सुरुवात होते, पण वारकरी या प्रतिकूलतेलाच अनुकूलता मानतो आणि वाटचाल करतो. व्यावहारिक जीवनातली प्रतिकूलता ही आध्यात्मिक जीवनातली अनुकूलता ठरत असते. त्यामुळे वारीतल्या कोणत्याही परिस्थितीला तोंड देण्याची वारकऱ्याची तयारी असते.

आषाढी वारीची परंपरा अनेक शतकापासून अखंड सुरू आहे. आळंदीहून संत ज्ञानेश्वर महाराज, देहूहून संत तुकाराम महाराज, त्र्यंबकेश्वरहून संत निवृत्तीनाथ महाराज, संत मुक्ताबाई, संत नामदेव, संत एकनाथ, संत जनाबाई, संत चोखामेळा, संत सावता माळी, संत गोरा कुंभार, संत नरहरी सोनार, संत कबीर याशिवाय महाराष्ट्रातील विविध भागांतून इतर अनेक संतांच्या पालख्या आणि हजारो दिंड्या आषाढी एकादशी सोहळ्यासाठी पंढरपूरला दाखल होतात. लाखो वारकरी विठ्ठल नामाचा गजर करत ज्ञानोबा माऊली तुकाराम या अखंड नामघोषाने, भक्तिभावाने पंढरीची वाट चालतात.

वारी माणसाला शिस्त, संयम, त्याग, मानवता आणि सेवाभाव शिकवते. अनेक किलोमीटरचा प्रवास करताना वारकरी नामस्मरण, अभंग, भजन आणि कीर्तननातून अध्यात्माचा अनुभव घेतात. प्रवासात अनेक सेवाभावी संस्था वारकऱ्यांना अन्न, पाणी, औषधे आणि इतर आवश्यक सुविधा पुरवतात. त्यामुळे समाजात दान आणि सेवाभावाची प्रेरणा मिळते.

आषाढी वारीचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे समतेचा संदेश होय. या ठिकाणी कोणत्याही प्रकारची जात, धर्म, भाषा,,गरीब किंवा श्रीमंत असा भेदभाव नसतो. सर्व वारकरी एकमेकांना 'माऊली' म्हणून संबोधतात. यामध्ये प्रेम, बंधुभाव आणि परस्पर सहकारी यांना सर्वोच्च स्थान आहे.

आजच्या स्पर्धेच्या धकाधकीच्या आणि तणावपूर्ण जीवनात वारी माणसाला मनःशांती, सकारात्मक विचार आणि समाजाशी जोडून ठेवणारी प्रेरणा देते. वारी आपल्याला संयम श्रद्धा, निःस्वार्थ सेवा आणि माणुसकीचे महत्त्व शिकवते. त्यामुळे वारी ही संत परंपरेचा अमूल्य वारसा असून महाराष्ट्राच्या संस्कृतीचे जिवंत वैभव आहे. वारी ही केवळ पंढरपूरची वाट नाही तर ती संतविचार, समता, भक्ती आणि मानवतेचा अखंड प्रवास आहे.

**वारीची भक्ती, विठ्ठलाची आस**
**नामस्मरणाचा अखंड श्वास,**
**एकादशीचा पवित्र सोहळा**
**देई जीवनाला नवा प्रकाश**

-**एच.एन. पाटील,** उपशिक्षक
तु.ह. वाजेकर विद्यालय, फुंडे-उरण



# संगीतार्जन कार्यक्रमाने रोहेकर मंत्रमुग्ध

**रोहा : प्रतिनिधी**

वरदाई चॅरिटेबल ट्रस्ट रोहा संचलित वरदा सुनील तटकरे संगीत व नृत्य अकॅडेमीच्या उद्घाटनप्रसंगी सुनील तटकरे युवा प्रतिष्ठानाच्या वतीने डॉ. चिंतामणराव देशमुख सभागृहात नामवंत कलाकार आणि वाद्यांची जुगलबंदी असणाऱ्या संगीतार्जन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.




या कार्यक्रमात गायिका अनुष्का पंडित आणि गायक ऋषिकेश रानडे यांनी सुंदर गीते सादर केली. बासरीवादक वरद कठापुरकर यांनी आपली कला सादर करून नागरिकांना मंत्रमुग्ध केले. श्रुती भावे यांच्या व्हायोलिन सादरीकरणाने कार्यक्रमास संगीत साज चढला. यासह ढोलकी, तबला, ढोल, हार्मोनियम, व्हायोलिन आदी वाद्यांची जुगलबंदी रोहेकरांनी अनुभवायला मिळाली. महाराष्ट्रातील नामवंत वाद्यवादक निलेश परब, कृष्णा मुसळे, कमलेश भडकमकर, अर्चिस लेले, दत्ता तावडे, आर्या पुराणकर हेही सहभागी झाले होते. सोबतीला वाद्यांची माहिती व सूत्रसंचालन पुष्कर श्रोत्री यांनी आपल्या अनोख्या शैलीतून केले.

यावेळी खासदार सुनील तटकरे यांनी नामवंत कलाकारांची कला रोहेकरांना पहावयास मिळावी आणि प्रेरणेतून येथे चांगला कलावंत घडावा, अशी अपेक्षा व्यक्त केली.

या कार्यक्रमास महिला व बालकल्याणमंत्री आदिती तटकरे, जि.प.चे उपाध्यक्ष मधुकर पाटील, नगराध्यक्ष वनश्री शेडगे, उपनगराध्यक्ष अहमद दर्जी, माजी नगराध्यक्ष समीर शेडगे, सभापती राजेंद्र जैन, महेश कोलाटकर, राष्ट्रवादी जिल्हाध्यक्ष सुधाकर घारे, महिला जिल्हाध्यक्ष उमा मुंढे, स्नेहल जगताप यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते, नागरिक उपस्थित होते. या वाद्याच्या जुगलबंदीला रोहेकरांनी रसिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत टाळ्यांनी दाद दिली.

# अमोल पेणकर यांची फेरनियुक्ती

**रोहा : प्रतिनिधी**

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या संघटनात्मक पुनर्रचनेच्या पार्श्वभूमीवर पक्षाचे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली राज्यभर नव्या पदाधिकाऱ्यांच्या नियुक्या करण्यात आल्या आहेत. मध्य रायगड जिल्हा सचिवपदी अमोल पेणकर यांची फेरनियुक्ती करण्यात आली आहे.

मुंबईतील शिवतीर्थ येथे आयोजित कार्यक्रमात राज ठाकरे यांच्या हस्ते पेणकर यांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले. पेणकर यांनी याआधी संघटनात्मक विविध जबाबदाऱ्या सांभाळल्या आहेत. त्यांची जल्हा सचिवपदी फेरनियुक्ती झाली आहे. यानंतर पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते यांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# पुतुल सोनोवालने रचला इतिहास!

## लॉन बॉल्स विश्वविजेत्याचा केला पराभव

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

कॉमनवेल्थ गेम्स स्पर्धेत भारताच्या ४३ वर्षीय लॉन बॉल्सपटू पुतुल सोनोवाल याने लॉन बॉल्स पुरुष एकेरीतील पहिल्याच सामन्यात जगातील अव्वल क्रमांकाचा आणि विद्यमान वर्ल्ड आउटडोअर चॅम्पियन रायन बेस्टर (कॅनडा) याचा पराभव करत मोठा उलटफेर घडवून आणला.

सेक्शन डी मधील या सामन्यात पुतुल याने दमदार सुरुवात करत पहिला सेट ५-४ असा जिंकला. त्यानंतर अनुभवी रायन बेस्टर याने पुनरागमन करत दुसरा सेट ७-३ने जिंकला आणि सामना टायब्रेकरपर्यंत गेला. निर्णायक क्षणी पुतुल याने अप्रतिम संयम राखत टायब्रेकर जिंकला आणि पुढील फेरीत धडक मारली. आता त्याचा पुढील सामना फॉकलंड आयलंड्सच्या सेसिल अलेक्झांडर याच्याशी होणार आहे.



पुतुल याचा हा विजय विशेष मानला जात आहे, कारण रायन बेस्टर हा सध्याचा वर्ल्ड आउटडोअर चॅम्पियन आहे. त्याच्या नावावर वर्ल्ड आउटडोअर चॅम्पियनशिपमध्ये सात पदके आहेत. २०२३मध्ये पॅरिस येथे झालेल्या स्पर्धेत त्याने एकेरी गटात सुवर्ण आणि कांस्यपदक जिंकले होते.कॉमनवेल्थ गेम्समध्येही त्याने २००६मध्ये कांस्य, तर २०१४ आणि २०१८मध्ये रौप्यपदक पटकावले आहे. २०२५मध्ये त्याचा वर्ल्ड बॉल्स हॉल ऑफ फेममध्येही समावेश करण्यात आला होता.

४३ वर्षीय पुतुल सोनोवाल हा मुळचा आसामचा रहिवासी आहे. आसाम पोलिसांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या पुतुलने वयाच्या ४३व्या वर्षी प्रथमच कॉमनवेल्थ गेम्समध्ये सहभाग घेतला आहे. याच वर्षी एशियन लॉन बॉल्स चॅम्पियनशिपमध्ये सुवर्णपदक जिंकून या खेळाडूने आपली क्षमता सिद्ध केली होती. राष्ट्रीय लॉन बॉल्स स्पर्धेतही त्याच्या नावावर पुरुष ट्रिपल्समध्ये सुवर्णपदक आणि पुरुष एकेरीत कांस्यपदक आहे. अनेक वर्षांच्या मेहनतीनंतर त्याने आता आंतरराष्ट्रीय स्तरावरही आपली छाप उमटवली आहे.

### महिला जोडीचाही शानदार विजय

लॉन बॉल्समध्ये भारताच्या महिला जोडीनेही विजयी सलामी दिली. रूपा राणी तिर्की आणि पिंकी सिंह यांनी माल्टाच्या रेबेका लुईस रिक्सन आणि कॉनी-ले रिक्सन यांचा थरारक टायब्रेकरमध्ये पराभव केला. भारतीय जोडीने पहिला सेट ७-१ असा जिंकला. मात्र माल्टाने दुसरा सेट ४-३ ने जिंकत सामना टायब्रेकरपर्यंत नेला. निर्णायक टप्प्यात रूपा आणि पिंकी यांनी दबावाखाली उत्कृष्ट खेळ करत अखेरच्या बाउलवर सामना आपल्या नावावर केला. आता त्यांचा पुढील सामना दक्षिण आफ्रिका विरुद्ध होणार आहे.

# टीम इंडियाची विजयी सलामी

## पहिल्या टी-२०मध्ये झिम्बाब्वेवर मात; मयंक, वैभव चमकले

**हरारे : वृत्तसंस्था**

वेगवान गोलंदाज मयंक यादवची भेदक गोलंदाजी आणि सलामीवीर वैभव सूर्यवंशीच्या अवघ्या १८ चेंडूंतील तुफानी अर्धशतकाच्या जोरावर भारताने पहिल्या टी-२० सामन्यात झिम्बाब्वेचा सात गडी राखून धुव्वा उडवला. या विजयासह भारताने तीन सामन्यांच्या मालिकेत १-० अशी आघाडी घेतली आहे.

सामन्यात नाणेफेक जिंकून भारताने प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. भारताचा हा निर्णय गोलंदाजांनी योग्य ठरवला. वेगवान गोलंदाज मयंक यादवने आपल्या चार षटकांत अवघ्या १८ धावा देत दोन महत्त्वाचे बळी टिपले. त्याच्या या उत्कृष्ट कामगिरीसाठी त्याला 'सामनावीर' म्हणून गौरवण्यात आले. त्याला प्रिन्स यादवने (२/१९) उत्तम साथ दिली.



शिवम दुबे आणि रवी बिश्नोई यांनी प्रत्येकी एक गडी बाद केला.

झिम्बाब्वेकडून वेस्ली मधेवेरेने सर्वाधिक ३९ धावा केल्या, तर रायन बर्लने २६ धावांचे योगदान दिले. भारताच्या अचूक गोलंदाजांनी झिम्बाब्वेला २० षटकांत ७ बाद १२५ धावांवरच रोखले. या सामन्यातून भारताच्या अशोक शर्माने आंतरराष्ट्रीय टी-२०मध्ये पदार्पण केले.

१२६ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना भारताची सुरुवात खराब झाली. अभिषेक शर्मा अवघ्या १ धावेवर बाद झाला, पण त्यानंतर आलेल्या वैभव सूर्यवंशीने झिम्बाब्वेच्या गोलंदाजांची पिसे काढली. वैभवने अवघ्या १८ चेंडूंमध्ये चार चौकार आणि चार षटकारांच्या मदतीने आपले झंझावाती अर्धशतक पूर्ण केले. तो ५० धावांवर बाद झाला, पण तोपर्यंत त्याने भारताचा विजय सुकर केला होता.

वैभव बाद झाल्यानंतर इशान किशनने २४ चेंडूंत ३५ धावांची उपयुक्त खेळी केली. कर्णधार श्रेयस अय्यरने संयमी फलंदाजी करत २४ चेंडूंत नाबाद २८ धावा केल्या, तर तिलक वर्माने नाबाद सहा धावा करत भारताला १३.२ षटकांत तीन बाद १२६ धावांवर पोहचवून विजय मिळवून दिला. झिम्बाब्वेकडून ब्लेसिंग मुझाराबानीने दोन, तर रिचर्ड नगारावा याने एक गडी बाद केला.

# रोहा तालुका चेस असोसिएशन अध्यक्षपदी प्रमोद म्हसकर

**रोहा : प्रतिनिधी**

रोहा तालुका चेस असोसिएशनची (आरटीसीए) कार्यकारिणी नूतन गठित करण्यात आली. यामध्ये अध्यक्षपदी प्रमोद म्हसकर यांची निवड झाली आहे.



नव्या कार्यकारिणीत कार्याध्यक्षपदी संकेत खोत, उपाध्यक्षपदी अमर सलागरे, सचिवपदी विक्रांत जाना, सहसचिवपदी विवेक कांबळे, खजिनदारपदी महेश बामुगडे आणि सहखजिनदारपदी योगेश भगत, तर कार्यकारिणी सदस्य म्हणून आभूषण मिठागरी, विवेक कानडे, ओमकार पवार, अनिकेत पाशिलकर, प्रशांत देशमुख, सुधीर जंगम, रवींद्र कान्हेकर आणि रोहन चव्हाण यांचा समावेश आहे.

नवनिर्वाचित अध्यक्ष प्रमोद म्हसकर यांच्या वाढदिवसानिमित्त व त्यांच्या सौजन्याने ९ ऑगस्ट रोजी रोहा येथे भव्य बुद्धिबळ स्पर्धेचे आयोजन करण्यात येणार आहे. या स्पर्धेसाठी २०० खेळाडूंची क्षमता निश्चित करण्यात आली असून खुल्या गटासाठी १०० रुपये नोंदणी शुल्क, तर १६ वर्षांखालील खेळाडूंसाठी प्रवेश विनामूल्य ठेवण्यात आला आहे.

रोहा तालुक्यातील बाल व युवा बुद्धिबळपटूंना नियमित प्रशिक्षण, योग्य मार्गदर्शन आणि स्पर्धात्मक व्यासपीठ उपलब्ध व्हावे या उद्देशाने म्हसकर यांच्या माध्यमातून पी.एम. चेस अकॅडमी सुरू करण्यात येणार असल्याची माहिती असोसिएशनचे उपाध्यक्ष अमर सलागरे यांनी दिली.

# क्रीडा संघटक रणजित राणे यांचा कृतज्ञता पुरस्काराने गौरव

**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग तालुक्यातील आवास येथील क्रीडा संघटक रणजित राणे यांना महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनतर्फे दिला जाणारा कृतज्ञता पुरस्कार राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत यांच्या हस्ते प्रदान करून गौरविण्यात आले.

या कार्यक्रमास राज्य कबड्डी असोसिएशनचे अध्यक्ष तथा माजी मंत्री गजानन कीर्तीकर, उपाध्यक्ष आमदार भाई जगताप, आमदार किरण सामंत, आमदार प्रमोद जठार, माजी आमदार दिनकर पाटील, राज्य कबड्डी असोसिएशनचे सरकार्यवाह माधव गायकवाड, खजिनदार मंगल पांडे व क्रीडाप्रेमी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



घरातून खेळाचा वारसा लाभलेले व आवासचे सरपंच असलेल्या रणजित राणे यांनी विविध खेळांच्या स्पर्धा आयोजित करून तरुण खेळाडूंना क्रीडा व्यासपीठ मिळवून दिले आहे. याची दखल घेत त्यांना पुरस्कार देण्यात आला. याबद्दल राज्य कबड्डी असोसिएशनचे सरकार्यवाह अ‍ॅड. आस्वाद पाटील, रायगडच्या सरकार्यवाह डॉ. चित्रा पाटील, सहकार्यवाह जे.जे. पाटील, पंच मंडळाचे प्रमुख तथा आंतरराष्ट्रीय कबड्डी प्रशिक्षक शरद कदम, छत्रपती पुरस्कार विजेते प्रमोद म्हात्रे, सूर्यकांत ठाकूर, संजय म्हात्रे, आशिष म्हात्रे, राष्ट्रीय खेळाडू संजय मोकल, असोसिएशन पदाधिकारी, सदस्य, पंच, विविध संघटनांचे पदाधिकारी, खेळाडू, क्रीडाप्रेमी नागरिक यांनी राणे यांचे अभिनंदन केले.

# आयएसएसएफ वर्ल्डकपमध्ये भारताच्या सैन्यमला रौप्यपदक

## अवघ्या ०.२ गुणांच्या फरकाने सुवर्णपदक हुकले

**हांगझोऊ : वृत्तसंस्था**

हांगझोऊ येथे सुरू असलेल्या आयएसएसएफ विश्वचषक (रायफल/पिस्तूल/शॉटगन) स्पर्धेच्या तिसऱ्या दिवशी भारतीय नेमबाजांनी दमदार सुरुवात करत पदकांचे खाते उघडलं आहे. भारताची युवा नेमबाज सैन्यम हिने दमदार कामगिरी करत महिलांच्या १० मीटर एअर पिस्तूल प्रकारात रौप्यपदकावर नाव कोरले. सैन्यमकडे सुवर्णपदक जिंकण्याची संधी होती, पण तिचे पदक अवघ्या पॉईंट ०.२च्या फरकाने हुकले, पण तिने जागतिक क्रमवारीत अव्वल स्थानी असलेल्या चीनच्या खेळाडूला घाम फोडला.

या स्पर्धेतील अंतिस सामन्यात अतिशय अटीतटीची लढत पाहायला मिळाली. युवा नेमबाज सैन्यमने या सामन्यात सुरुवातीलाच आघाडी घेतली आणि ती शेवटपर्यंत टिकवून ठेवली. अंतिम फेरीत तिने २४३.४ गुणांची कमाई केली. तिची सुवर्णपदकाची लढाई अव्वल स्थानी असलेल्या चीनच्या कियानक्सुन याओसोबत होती. कियानक्सुन याओने आपल्या होम ग्राऊंडवर खेळताना २४३.६ गुणांची कमाई केली आणि सुवर्णपदकावर नाव कोरले.

सैन्यमची इतिहास घडवण्याची संधी अवघ्या ०.२ गुणांनी हुकली, पण तिने जगातील नंबर १ खेळाडूला जी कडवी झुंज दिली त्याचे जगभरातून कौतुक होत आहे. सैन्यमला भारताच्या नेमबाजी खेळातील भविष्य म्हटले जाते. महिलांच्या १० मीटर एअर पिस्तूल प्रकारात तिने भारताला अनेक पदके जिंकून दिली आहेत.

# कॉमनवेल्थ गेम्सचा शानदार प्रारंभ

## मीराबाई-लव्हलिनाच्या नेतृत्वात भारताची मार्च-पास्ट

**ग्लासगो : वृत्तसंस्था**

कॉमनवेल्थ गेम्स स्पर्धेचा उद्घाटन सोहळा स्कॉटलंडमधील ग्लासगो येथे मोठ्या उत्साहात झाला. ओव्हीओ हायड्रो अरेनामध्ये पार पडलेल्या दिमाखदार सोहळ्यात भारताकडून ऑलिम्पिक पदकविजेत्या मीराबाई चानू आणि बॉक्सिंगपटू लव्हलिना बोरगोहेन यांनी हातात तिरंगा घेऊन दलाचे नेतृत्व केले.

ब्रिटनचे राजे चार्ल्स तिसरे आणि राणी कॅमिला यांच्या हस्ते स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले. त्यानंतर ७४ देशांच्या खेळाडूंची दिमाखदार मार्च-पास्ट झाली. उद्घाटन सोहळ्यात इलेक्ट्रॉनिक म्युझिक बँड वाल्टोस यांच्यासह अनेक कलाकारांनी रंगतदार सादरीकरण केले.

२३ जुलै ते २ ऑगस्टदरम्यान होणाऱ्या या स्पर्धेत भारत १२६ खेळाडूंच्या तुकडीसह सहभागी झाला आहे. भारतीय तुकडीने ओव्हीओ हायड्रो अरेनामध्ये दिमाखदार प्रवेश केला. हातात छोट्या तिरंग्यांसह खेळाडूंनी उद्घाटन सोहळ्याच्या उत्साही वातावरणाचा मनमुराद आनंद लुटला. भारताची ध्वजवाहक मीराबाई चानू, तर समारंभिक बॅटनवाहक लव्हलिना बोरगोहेन होती. ग्लासगोतील प्रेक्षकांनी टाळ्यांच्या कडकडाटात भारतीय तुकडीचे स्वागत केले.

उद्घाटन सोहळ्यातील एका विशेष क्षणी लव्हलिना बोरगोहेनने समारंभिक बॅटन पुढे सुपूर्द केले. त्यानंतर मीराबाई चानू आणि लव्हलिना यांनी एकत्रितपणे तिरंगा हातात घेत तुकडीचे नेतृत्व करत दिमाखात मार्च केला. त्याला उपस्थित प्रेक्षकांनी उत्स्फूर्त दाद दिली.

# जपानमध्ये घुमणार हुतुतूचा दम!

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

जपानमधील आयची-नागोया येथे होणाऱ्या आशियाई क्रीडा स्पर्धा २०२६मधील कबड्डी सामन्यांची गटवारी जाहीर करण्यात आली असून भारताच्या पुरुष आणि महिला या दोन्ही कबड्डी संघांचा 'अ' गटात समावेश करण्यात आला आहे.

आशियाई क्रीडा स्पर्धा १९ सप्टेंबर ते ४ ऑक्टोबर या कालावधीत जपानच्या आयची प्रांतात होणार आहेत. कबड्डीचे सामने २१ ते २६ सप्टेंबरदरम्यान तोकाई सिटिझन्स जिम्नॅशियम येथे रंगणार आहेत. पुरुष गटात एकूण

## आशियाई क्रीडा स्पर्धेतील कबड्डीची गटवारी जाहीर

१० संघ सहभागी होणार असून त्यांना प्रत्येकी पाच संघांच्या दोन गटांत विभागण्यात आले आहे. पुरुषांच्या 'अ' गटात भारतासह बांगलादेश, दक्षिण कोरिया, चिनी तैपेई आणि यजमान जपान यांचा समावेश आहे, तर महिलांच्या 'अ' गटात भारताखेरिज इराण, जपान, बांगलादेश 'ब' गट : श्रीलंका, थायलंड, चिनी तैपेई, नेपाळ हे संघ आहेत.

# कर्णधार श्रेयस अय्यरकडून वैभव सूर्यवंशीचे कौतुक

**मुंबई : प्रतिनिधी**

भारत आणि झिम्बाब्वे यांच्यातील तीन टी-२० सामन्यांच्या मालिकेतील पहिल्या सामन्यात टीम इंडियाने दमदार विजय मिळवला. युवा फलंदाज वैभव सूर्यवंशी भारताच्या विजयाच्या शिल्पकार ठरला. पहिल्या टी-२० सामन्यातील धमाकेदार विजयानंतर कर्णधार श्रेयस अय्यरने वैभवचे भरभरून कौतुक केले आहे.

अय्यर म्हणाला की, वैभवची फलंदाजी खरोखरच उत्कृष्ट होती. त्याच्या खेळात दडपण किंवा भीतीचे कोणतेही चिन्ह नव्हते.



त्याने ज्या पद्धतीने ही खेळी साकारली ती अप्रतिम होती. वैभव यापूर्वी या मैदानावर खेळला आहे, त्यामुळे त्याला इथल्या खेळपट्टीची चांगली कल्पना होती. त्याने अंडर-१९च्या फायनलमध्ये याच मैदानावर १७५ धावांची वादळी खेळी साकारली होती. त्यामुळे जेव्हा तो मैदानात उतरतो, तेव्हा त्याच्यात नक्कीच खूप आत्मविश्वास असतो. आज त्याची खेळी पाहून खूप आनंद झाला.

१५ वर्षीय वैभव सूर्यवंशीने आपल्या खेळीत चार चौकार आणि चार षटकार मारत अवघ्या १८ चेंडूत आपले पहिले आंतरराष्ट्रीय अर्धशतक पूर्ण केले. वयाच्या अवघ्या १५ वर्षे आणि ११८ दिवस इतक्या कमी वयात आंतरराष्ट्रीय टी-२०मध्ये अर्धशतक झळकावणारा तो जगातील सर्वात तरुण फलंदाज ठरला आहे.

# नाणेफेक जिंकण्यात श्रेयसने धोनीला टाकले मागे



**मुंबई :** भारत आणि झिम्बाब्वे यांच्यातील तीन सामन्यांच्या टी-२० मालिकेतील पहिली लढत हरारे स्पोर्ट्स क्लबवर झाली आहे. मालिकेतील पहिल्याच सामन्यात भारतीय कर्णधार श्रेयस अय्यरने नाणेफेक जिंकत भारतीय क्रिकेटमधील एक मोठा विक्रम आपल्या नावावर केला.

कर्णधार म्हणून सलग आठव्यांदा नाणेफेक जिंकत श्रेयस अय्यरने माजी कर्णधार महेंद्रसिंह धोनीचा सलग सात नाणेफेकींचा विक्रम मागे टाकला. भारतीय टी-२० क्रिकेटमध्ये सलग सर्वाधिक वेळा नाणेफेक जिंकणारा कर्णधार बनण्याचा मान आता अय्यरच्या नावावर जमा झाला आहे.

# वैभवकडून विक्रमी खेळी प्रशिक्षक, आई-वडिलांना समर्पित

**मुंबई : प्रतिनिधी**

भारत आणि झिम्बाब्वे या दोन्ही संघांमध्ये सुरू असलेल्या तीन टी-२० सामन्यांच्या मालिकेतील पहिल्याच सामन्यात १५ वर्षीय फलंदाज वैभव सूर्यवंशीचा बोलबाला पाहायला मिळाला आहे. त्याने अवघ्या १८ चेंडूंचा सामना करत वेगवान अर्धशतकी खेळी केली आणि सचिन तेंडुलकरचा ३७ वर्षांपूर्वीचा रेकॉर्ड मोडला आहे. वैभवने ही खेळी आपल्या प्रशिक्षकांना आणि आई वडिलांना समर्पित केली आहे.



या अर्धशतकी खेळीसह वैभव हा आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये अर्धशतक झळकावणारा सर्वात युवा फलंदाज बनला आहे. सचिनने १६ वर्ष २१३ दिवस इतके वय असताना विक्रमी अर्धशतकी खेळी केली होती. आता वैभवने वयाच्या १५व्या वर्षी अर्धशतक झळकावले आहे.

बीसीसीआयने आपल्या सोशल मीडिया अकाऊंटवर शेअर केलेल्या व्हिडीओमध्ये बोलताना वैभव सूर्यवंशी म्हणाला, जेव्हा तुमच्या कारकिर्दीच्या सुरुवातीलाच तुम्हाला अशी एखादी खेळी खेळायची संधी मिळते, त्यामुळे येणाऱ्या सामन्यांमध्ये नक्कीच आत्मविश्वास वाढलेला असतो. मी माझ्या झोनमध्ये होतो आणि माझ्या ताकदीवर विश्वास ठेवून फटकेबाजी केली.

वैभव पुढे म्हणाला की, काही अशी मैदाने आहेत, जिथे तुम्हाला धावा करायला आवडतात, पण मी या गोष्टींचा फार विचार करत नाही.

# ज्युडोपटू अरुण कुमार कॉमनवेल्थ स्पर्धेबाहेर

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

कॉमनवेल्थ गेम्स सुरु होताच भारतीय पथकाला मोठा धक्का बसला आहे. ज्युडो खेळाडू अरुण कुमार डोपिंग चाचणीत अपयशी ठरल्याने त्याला स्पर्धेपूर्वीच संघातून बाहेर करण्यात आले आहे.

स्कॉटलंडमधील ग्लासगो येथे सुरू झालेल्या कॉमनवेल्थ गेम्समध्ये भारताला पदकाची आशा असलेल्या ज्युडोपटू अरुण कुमार (७३ किलो गट) याची राष्ट्रीय अँण्टी डोपिंग एजन्सी चाचणी पॉझिटिव्ह आली. त्यामुळे भारतीय ऑलिम्पिक संघटनेने त्याला तातडीने स्पर्धेतून बाहेर करण्याचा निर्णय घेतला आहे.

# सॅम करनचा भाऊ भारताविरुद्धच्या पहिल्या टी-२० सामन्यात फेल!



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारताचा युवा क्रिकेटपटू वैभव सूर्यवंशी याने झिम्बाब्वेविरुद्धच्या पहिल्या टी-२० सामन्यात अप्रतिम क्षेत्ररक्षण करत सर्वांचे लक्ष वेधले. इंग्लंडचा अष्टपैलू सॅम करनचा भाऊ बेन करन याचा त्याने शानदार झेल घेत भारताला महत्त्वाचे यश मिळवून दिले. हरारे स्पोर्ट्स क्लबवर रंगलेल्या सामन्यात झिम्बाब्वेच्या डावातील चौथ्या षटकातील दुसऱ्या चेंडूवर प्रिन्स यादवच्या खात्यात ही विकेट जमा झाली.

प्रिन्सने ऑफ स्टंप बाहेर टाकलेल्या आखूड टप्प्यावरील चेंडूवर बेन करनने पुल शॉट खेळण्याचा प्रयत्न केला, मात्र चेंडू टाइम करता आला नाही. मिडविकेटवर क्षेत्ररक्षण करणाऱ्या वैभव सूर्यवंशीने डावीकडे झेप घेत उत्कृष्ट झेल टिपला आणि प्रिन्स यादवला सामन्यातील पहिले यश मिळवून दिले.

भारतीय संघाचा कर्णधार श्रेयस अय्यर याने नाणेफेक जिंकून पहिल्यांदा गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. त्याचा निर्णय गोलंदाजांनी सार्थ ठरवला. मयांक यादवने डावातील पहिल्याच चेंडूवर झिम्बाब्वेचा स्टार फलंदाज ब्रायन बेनेटला गोल्डन डकसह तंबूचा रस्ता दाखवला. त्यानंतर तिसऱ्या षटकात प्रिन्स यादव याने बेन करनला १० धावांवर बाद केले. पॉवरप्लेमध्ये भारताने तीन विकेट्स घेत झिम्बाब्वेवर सुरुवातीपासूनच दबाव निर्माण केला. वैभव सूर्यवंशीच्या चपळ क्षेत्ररक्षणामुळे भारताला आणखी एक महत्त्वाची विकेट मिळाली आणि युवा खेळाडूने आपल्या अष्टपैलू कामगिरीची झलक दाखवून दिली.

सॅमचा भाऊ बेन करन याने बांगलादेशविरुद्धच्या मालिकेत दमदार फलंदाजीचा नजराणा पेश केला होता. टीम इंडियासाठीही तो डोकेदुखी ठरू शकला असता, पण प्रिन्स यादवने त्याला अचूक टप्प्यावर केलेली गोलंदाजी अन् क्षेत्ररक्षणात १५ वर्षीय वैभव सूर्यवंशीनं दाखवलेली धमक यामुळे त्याला बेनला या सामन्यात दुहेरी आकडा गाठताच तंबूचा रस्ता धारावा लागला. बांगलादेशविरुद्धच्या वनडे मालिकेत नाबाद १११ धावांच्या शतकी खेळीसह त्याने लक्ष वेधून घेतले होते, मात्र टीम इंडियाविरुद्ध त्याला मैदानात फार काळ तग धरता आला नाही.

# डब्ल्यूटीसी फायनलचे वेळापत्रक जाहीर

**मुंबई :** जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेच्या (डब्ल्यूटीसी) २०२५-२७ हंगामाच्या अंतिम सामन्याची तारीख आणि स्थळ आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने (आयसीसी) जाहीर केले आहे. ९ ते १३ जून २०२७ दरम्यान लंडनमधील द ओव्हल मैदानावर डब्ल्यूटीसी फायनल खेळवली जाणार आहे.

आयसीसीने यापूर्वीच २०२७, २९ आणि ३१ या तीनही जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धांच्या अंतिम फेऱ्या इंग्लंडमध्येच आयोजित करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे सलग चौथ्यांदा डब्ल्यूटीसी फायनल इंग्लंडमध्ये रंगणार आहे. सध्या सुरू असलेल्या डब्ल्यूटीसी २०२५-२७ चक्रातील गुणतालिकेत सध्या ऑस्ट्रेलिया पहिल्या, तर दक्षिण आफ्रिका दुसऱ्या स्थानावर आहे. न्यूझीलंड तिसऱ्या, बांगलादेश चौथ्या आणि भारत पाचव्या स्थानी आहे. नियमांनुसार गुणतालिकेतील अव्वल दोन संघ अंतिम सामन्यासाठी पात्र ठरतात.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com